follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com । पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 ∴ वर्ष २५ ∴ अंक २२१ ∴ सातारा ∴ शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४ ∴ पाने ६ (सुप्रभात) ∴ किंमत ५/– रूपये



उमेदवारांच्या निवडणूक खर्चविषयक नोंदी काटेकोर ठेवा!

वृत्त पान ३ वर...

# उदयनराजे यांच्या समर्थनार्थ साताऱ्यात लोटला जनसागर

## भव्य शक्ती प्रदर्शनाने अर्ज दाखल; मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती



**राजदंड / सातारा**

**महायुतीचे साताऱ्याचे उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांचा अर्ज गुरुवारी भव्य शक्ती प्रदर्शनाने दाखल करण्यात आला. उदयनराजे यांना पाठिंबा देण्यासाठी सातारा जिल्ह्याच्या सहा विधानसभा मतदारसंघाचे समर्थक मोठ्या प्रमाणावर साताऱ्यात जमले होते. यावेळी गांधी मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय अशा काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये पाच हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते सहभागी झाले होते. उदयनराजे यांच्या समर्थनासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे स्वत: साताऱ्यात दाखल झाले होते.**

उदयनराजे यांच्या शक्ती प्रदर्शनाचे सूक्ष्म नियोजन उदयनराजे मित्र समूह आणि सातारा विकास आघाडीच्या वतीने करण्यात आले होते. जलमंदिर ते गांधी मैदान यादरम्यान बैलगाडीमधून उदयनराजे यांची रॅली काढण्यात आली. शुक्रवार पेठेतील मरीआई माता मंदिराच्या कोपऱ्यावर या बैलगाडीमध्ये फटाक्यांच्या आतिषबाजी नंतर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले या बैलगाडीवर स्वार झाले. शिवेंद्रसिंहराजे उदयनराजे यांच्यासह अतुल भोसले हे सुद्धा बैलगाडीत स्वार झाले आणि जलमंदिर पासून ते गांधी मैदानापर्यंत उदयनराजे आगे बढो हम तुम्हारे साथ है, आले रे आले राजे आले अशा घोषणांनी जलमंदिरचा परिसर दणाणला. गांधी मैदानावर आल्यानंतर भाजपच्या महिला कार्यकर्त्यांनी उदयनराजे भोसले यांचे औक्षण केले. यावेळी भाजपचे कमळ चिन्ह असलेला फुलांनी सजवलेल्या



रथ तयार करण्यात आला होता. या रथावर उदयनराजे, शिवेंद्रसिंहराजे, लोकसभा प्रभारी अतुल भोसले, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, शिंदे समर्थक जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव तसेच पालकमंत्री शंभूराज देसाई आदी मान्यवर होते.

रॅली गांधी मैदानावरून राजपथाच्या दिशेने मार्गस्थ झाली त्यावेळी तरुणाईने जोरदार जल्लोष केला तत्पूर्वी युवकांची बाईक रॅली काढण्यात आली होती. गांधी मैदानावर भर तळपत्या उन्हामध्ये हजारो समर्थकांचा जथा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने चालू लागला रॅली मोती चौक, देवी चौक, कमानी हौद तेथून शेटे चौकातून कर्मवीर पथावरून पोवई नाक्याकडे मार्गस्थ झाली. सातारा शहरात ठिकठिकाणी उदयनराजे यांच्या रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत झाले. दरम्यान दुपारी दीड वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे तिघेही एकाच हेलिकॉप्टरमधून पोलीस कवायत मैदानावर दाखल झाले. तेथून लगेच तिघेही पोवई नाक्यावर आले तेव्हा तेथे रॅलीचे रूपांतर अभिवादन कार्यक्रमात झाले. सर्व मान्यवरांच्या वतीने छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजित दादा पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई, लोकसभा प्रभारी अतुल भोसले ही ठराविक मंडळी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आले. दुपारी २ वाजून ४० मिनिटांनी उदयनराजे भोसले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

सुमारे दोन तास झालेल्या या रॅलीला प्रचंड जनसागर लोटला होता. रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे महायुतीच्या नेत्यांचा उत्साह दुणावला आहे.

# सुप्रिया सुळे यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज



**पुणे/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या वतीने निवडणूक लढवित असणाऱ्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार सुप्रिया सुळे यांनी आज प्रचंड शक्तिप्रदर्शनासह आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा निवडून येण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासह अन्य महाविकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती पक्षाचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख व आमदार सचिन अहिर, सुषमा अंधारे, माजी मंत्री व आमदार विश्वजित कदम, खासदार व शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ अमोल कोल्हे, आमदार संग्राम थोपटे, आमदार संजय जगताप, आमदार अशोक पवार, माजी आमदार जयदेव गायकवाड, युगेंद्र पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूर तालुकाध्यक्ष तेजसिंह पाटील, दौंड तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार, रामभाऊ टुले यांच्यासह महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या, ''राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीची अधिकृत उमेदवार म्हणून मी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित आहे. या निवडणूकीचा उमेदवारी अर्ज आज विधान भवन येथे आदरणीय पवार साहेब व त्यांच्यावर नितांत प्रेम करणारी जनता, (पान ३ वर)

# मोदींचा पराभव करायला तयार रहा!

## शरद पवार यांचे आवाहन; महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकरी, महिला, रोजगार या बाबत दिलेली आश्वासने आणि वस्तुस्थिती यात फरक आहे. २०१५ मध्ये पेट्रोल ७१ रुपये होते. आज ३६५० दिवस झाल्यावर पेट्रोल १०६ रुपये झाले. ४१० रुपयांचा सिलेंडर ११६० रुपये झाला. तरुणांना दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देणार होते. दहा वर्षांत नोकऱ्या कमी झाल्या. आता मोदींना सत्ता द्यायची नाही, याचा निर्णय घ्यावा लागेल. मोदींवर टीका केली म्हणून झारखंडचे मुख्यमंत्री, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, बंगालचे तीन मंत्री तुरुंगात गेले. देशातील लोकशाही उद्ध्वस्त होत आहे. सत्तेचा उन्माद काय असतो हे मोदींनी दाखवले आहे. मोदींचा पराभव करण्यासाठी तयार रहा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

पुण्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार उमेदवार रवींद्र धंगेकर, बारामतीच्या उमेदवार सुप्रिया सुळे, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. त्यानंतर महाविकास आघाडीतर्फे जाहीर सभा झाली. (पान ३ वर)

## थोडक्यात

### बैलगाडा शर्यतीत जखमी झालेल्या वृध्दाचा मृत्यू



**भोर :** भोरमध्ये जानाईदेवी आणि रामनवमीच्या यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान बैलगाडा शर्यत सुरू असताना एक बैलगाडा एका ज्येष्ठ नागरिकाच्या अंगावर गेल्याने सदर व्यक्तीच्या डोक्याला व छातीला गंभीर दुखापत झाली होती. त्यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. विष्णू गेनबा भोमे (वय ६५, रा. शिंद, ता. भोर, जि. पुणे) असे मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

### पुण्यात गोळीबाराच्या घटना सुरूच...

**पुणे :** पुणे शहरात कायदा आणि व्यवस्था अस्तित्वात आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण मागील दोन दिवसात पुणे शहरात गोळीबाराच्या तीन घटना घडल्या आहेत. आज पहाटेच्या सुमारास सिंहगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील भुमकर चौकात एका तरुणावर गोळीबार करण्यात आला. सुदैवाने या घटनेत हा तरुण बचावला.

तत्पूर्वी बुधवारी पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावर एका बांधकाम व्यवसायिकावर दुचाकीवर आलेल्या दोघांनी गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र ऐनवेळी दिसून नादुरुस्त झाल्याने हा तरुण बचावला. तर हडपसर पोलीस स्टेशनच्या हाती शेवाळवाडी परिसरात व्यावसायिक वादातून गोळीबार झाल्याची घटना घडली. एका माजी सैनिकाने दुसऱ्या माजी सैनिकावर गोळ्या झाडल्या.

### भोर शहरात तरुणावर कोयत्याने वार

**भोर :** भोर शहरातील सम्राट चौक भागात यात्रेदरम्यान जुन्या वादातून उत्रौली (ता. भोर ) येथील तरुणावर एकाने कोयत्याने वार केल्याची घटना रविवार (दि.१७) रोजी रात्री ७:३० च्या सुमारास घडली असून या प्रकरणी भोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

केशव धर्मेंद्र शिंदे (रा. उत्रौली ता. भोर) असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून रोहित जाधव (रा.भोलावडे ता. भोर) यांच्यासह इतर दोन जणांवर भोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे.

# अजिंक्यतारा कारखान्यावर गोळीबार; सुरक्षारक्षक ठार

**राजदंड / सातारा**

शेंद्रे येथील अजिंक्यतारा साखर कारखान्याच्या रेणुका शुगर बगॅस शुगर मिलच्या यार्डमध्ये वादावादीच्या कारणातून सुरक्षा रक्षकावर पिस्टलमधून गोळीबार करण्यात आला. यामध्ये सुरक्षारक्षक अंकुश रामकृष्ण शिंदे (वय ४५, राहणार भरतगाववाडी, तालुका सातारा) यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंद झाला आहे. संशयिताला पोलिसांनी पाच तासाच्या शोधमोहिमेनंतर ताब्यात घेतले आहे.

याबाबतची पोलिसांनी दिलेली माहिती अशी सत्यवान बाळकृष्ण साळुंखे, राहणार बोरगाव, तालुका सातारा यांनी तक्रार दिलेली आहे. त्यानुसार शुभम बाळासाहेब चव्हाण, राहणार बसपाचीवाडी, तालुका सातारा याच्यावर खुनाचा गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादीनुसार दिनांक १७ एप्रिल रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास हा प्रकार घडला. मृत अंकुश शिंदे हे मागील सहा महिन्यापासून शेंद्रे तालुका सातारा (पान ३ वर)

### दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी कार चालकावर गुन्हा

**सातारा :** एका दुचाकीस्वाराला धडक देवून त्याच्या मृत्यूप्रकरणी कार चालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरानजीक महामार्गावर दुचाकी व कारचा झालेल्या अपघातात प्रकाश शामराव चव्हाण (वय ४६, रा. चिंचणेर निंब ता.सातारा) यांचा मृत्यू झाला. हा अपघात १६ एप्रिल रोजी झाला आहे. याप्रकरणी कारचा क्रमांक मिळाला असून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# ...अखेर कोकणात नारायण राणे यांची उमेदवारी जाहीर

## रत्नागिरी, सिंधूदुर्गातून किरण सामंत यांची माघार

**मुंबई/प्रतिनिधी**

अखेर रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात तिढा सुटला असून शिवसेना शिंदे गटाचे किरण सामंत यांनी माघार घेतली असून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

कोकणातील हा महत्वाचा मतदारसंघ महायुतीमध्ये दीर्घ काळ वादाचे कारण ठरला होता. शिवसेना शिंदे गट आणि भारतीय जनता पक्ष या दोघांचाही या मतदारसंघावर दावा होता. शिवसेनेकडून राज्यातील ज्येष्ठ मंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते तर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी या मतदारसंघात रिंगणात उतरावे, अशी भाजपची इच्छा होती.

भाजप शिवसेना युती असताना हा मतदारसंघ दीर्घकाळ शिवसेनेकडे होता. शिवसेनेचे विनायक राऊत यांनी दोन वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यामुळे शिवसेना फुटल्यानंतरही हा मतदारसंघ आपल्याकडे राहावा असा शिंदे



गटाचा आग्रह होता. त्यांनी किरण सामंत यांची उमेदवारीही निश्चित केली होती. मात्र, शिवसेना फुटल्यानंतर राजकीय समीकरणे बदलल्याचा दावा करून भाजपने या मतदारसंघासाठी आग्रह धरला होता. शिवाय राज्यसभेतून निवृत्त झालेल्या किंवा कमी कालावधी उरलेल्या खासदारांना लोकसभेच्या रिंगणात उतरविण्याचे धोरण अमलात आणण्याचे धोरण भाजपाने अंगीकारले आहे. त्यानुसार ही जागा नारायण राणे यांनी लढवावी, अशी भाजपची इच्छा आहे. नारायण राणे यांनी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच मतदारसंघात आपला प्रचारही सुरू केला आहे.


अखेर महायुतीमध्ये भाजपच्या आग्रहाला मान देऊन शिंदे गटाने माघार घेतली आहे या मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे विद्यमान खासदार विनायक राऊत आणि भाजपाचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यात लढत होणार हे निश्चित झाले आहे.


# मेढा, जावली, वाई परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस


## ठिकठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प; खंडाळा परिसरातही जोरदार पाऊस

**राजदंड / पाचगणी**

गेल्या काही दिवसांपासून सातारा जिल्ह्यासह जावली तालुक्यामध्ये वातावरणात कमालीची उष्णता निर्माण झाली होती. उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले होते. तापमान ४० ते ४२ डिग्रीवर गेल्याने सर्वसामान्य नागरिकांची लाहीलाही झाली होती. नागरिक, शेतकरी चांगलेच हैराण झाले होते; परंतु बुधवारी दुपारी अचानक विजेच्या कडकडासह ढगांच्या गडगडाटात अवकाळी पावसाने कुडाळ, करहर, सर्जापूर, म्हसवे, सरताळे परिसरात धुमाकूळ घातला. मात्र, या पावसाने तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे







वातावरण दिसून आले. तसेच काही ठिकाणी अजूनही ज्वारी काढणी सुरू आहे. त्यामुळे या अवकाळीचा फटका ज्वारी पिकाला तसेच कडब्याला बसला. ऊस व फळबागेला मात्र या पावसामुळे नवसंजीवनी मिळणार आहे.

बुधवारी दुपारी अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मोठमोठी झाडे उनमळून पडली. या पावसामुळे (पान ३ वर)

### मेघगर्जनेसह खंडाळ्यात सुमारे एक तास अवकाळी पाऊस

**राजदंड / खंडाळा**

विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पारगाव-खंडाळा येथे रात्री सुमारे एक तास अवकाळी पावसाने हजेरी लावली.त्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला होता.

गत काही दिवसांपासून हवेत उष्मा वाढल्याने नागरिक उकाड्याने त्रस्त तर रस्ते ओस पडत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पंख्यांची घरघर सुरू आहे. तसेच दुकानांमध्ये थंडपेय, उसाचा रस याला मागणी वाढली आहे. (पान ३ वर)

# ज्यांना लेकीत अन् सुनेत अंतर वाटते, त्यांच्या पदरात धोंडे पडणार

- मुख्यमंत्री शिंदेंचा शरद पवारांवर निशाणा
- सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**पुणे :** बारामतीमधील निवडणूक लढतीसंदर्भात बोलताना, शरद पवारांनी मूळ आणि बाहेरचे पवार असे म्हणत सुनेत्रा पवार ह्या सुन आहेत, तर सुप्रिया ही पवारांची लेक असल्याचं बोलून दाखवलं होत. त्यावर, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी थेट हल्लाबोल केला आहे.

ज्यांना लेकीत आणि सुनेत अंतर वाटते त्यांना मनातल्या मनात मांडे खाऊ द्या. ज्यांच्या मनात मांडे असतात त्यांच्या पदरात धोंडे पडल्याशिवाय राहणार नाही. सुनेत्रा पवार आणि अजित पवार बारामतीचा कायापालट केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत, असे मतही मुख्यमंत्री शिंदेंनी व्यक्त केले. सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शिंदे पुण्यात दाखल झाले होते. यावेळी त्यांनी जोरदार हल्लाबोल केला.

एकनाथ शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहिले असून ते (पान ३ वर)

# सातारा लोकसभा पॉलिटिकल वॉर्मिंग

सध्या देशात सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणुकांचे वारे वाहत असल्याने राजकीय विचारवंतांना, लोकप्रतिनिधींना सुगीचे दिवस आलेले आहेत. प्रचाराच्या ओघात नेत्यांना दोन दिवसापूर्वी आपण काय बोललो होतो किंवा एखाद्या घटनेविषयी पूर्वी आपली मतं काय होती याचा त्यांना खरंच विसर पडतो की ही मंडळी सर्वसामान्यांना मूर्ख समजतात हे समजायला मार्ग नाही. ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येने अनेक वर्षांपासून जगाला भेडसावलेलं आहे, पृथ्वीच्या वातावरणातील ओझोन वायूचा थर विरळ झाल्याने उष्णतेचे तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या वातावरणात प्रचंड उष्णता आहे ऊन मी म्हणतंय पारा ४०ल च्या वर आहे, देशाच्या व राज्याच्या राजकीय वातावरणात सुद्धा असाच भडका उडालेला आहे. देशात, राज्यात असेच सूर्यासारखे तेजस्वी कारभारी आहेत त्यांच्या वागणुकीमुळे राजकीय वातावरणातला नैतिकतेचा थर विरळ होत चाललाय आणि त्याचा चटका मात्र सर्वसामान्य जनतेला बसतोय. लोकसभा ही देशाचं भविष्य ठरवणारी, देशाला दिशा देणारी, देशाला प्रगतीच्या वाटा दाखवणारी निवडणूक आहे परंतु सत्तेतल्या महाभागांनी लोकसभेची ही निवडणूक अगदी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पातळीवर आणून ठेवली आहे असं खेदानं म्हणावं लागेल.

अलीकडेच देशाच्या मा.पंतप्रधानांनी अतिशय दुर्मिळ अशी मुलाखत एका वृत्तवाहिनीला दिली त्यात त्यांनी निवडणूक रोख्यांचं समर्थन अशा पद्धतीने केले आहे की जणू भारतातील जनतेचं हित त्यात सामावलेलं आहे, जनतेचा विकास त्यात दडलेला आहे. निवडणूक रोखे ही तर राजकारण्यांसाठी रॉयल्टी त्याचंही समर्थन जर पंतप्रधानांना जाहीररित्या करावं लागत असेल तर त्याच्यासारखी दुसरी शरमेची बाब नाही. सर्वसामान्यांना नेत्यांचा जो चंगळवाद दिसतो, चकाचौंद राहणीमान दिसते तो पैसा या रोख्यांव्यतिरिक्त असावा, चंगळवादासाठी लोककल्याणाच्या नावाखाली जनतेकडून वारेमाप पैसा ओरबडलेला असतो. सरकार वारंवार फुकटची आश्वासनं देतं, गॅरंटी देतं कुणाच्या जीवावर तर करदात्यांच्या भरवशावर, जगण्यासाठी लागणाऱ्या सुखसोयींच्या बदल्यात जनता सरकारला कराच्या रूपात पैसा देते. घरोघरी पाईपलाईनने गॅस पुरवठा, ७० वर्षावरील लोकांना मोफत उपचार, गरिबांसाठी लाखो घरं, धान्य, पाणी, वीज फुकट परंतु पब्लिकला गॅरंटी नोकरीची पाहिजे, गॅरंटी माफक दरातल्या आरोग्य सुविधांची पाहिजे, गॅरंटी कमी पैशातल्या शिक्षणाची पाहिजे. राज्यघटना बदलण्याचा विरोधकांचा आरोप तथ्यहीन असल्याचा दावा मा. पंतप्रधान याच मुलाखतीत करतात, पूर्वी दक्षिण भारतातल्या भाजपच्याच खासदाराने राज्यघटना बदलण्याचे सरकारचे मनसुबे जाहीरपणाने बोलून दाखवलेले आहेत. संविधानातील मूल्यांना बगल देऊन भाजपा सरकारने संविधानच बोथट करून टाकलं आहे. जणूकाही ही एक प्रकारची अघोषित आणीबाणीच आहे. रामलल्लाच्या मंदिराचे बांधकाम अर्धवट असताना अगोदरच उद्घाटन करून टाकले, रामनवमीपर्यंत सुद्धा सरकारला धीर धरवला नाही, प्रभू रामचंद्रालाही सरकारी जाच सहन करावा लागत असेल तर ही कसली लोकशाही हे कसलं रामराज्य?

रामनवमीच्या पूर्वसंध्येचा मुहूर्त साधत सातारा लोकसभेसाठी महायुतीने खा. श्री उदयनराजे भोसले यांची अधिकृत उमेदवारी जाहीर केली मुहूर्ताचं जर एवढं महत्त्व असेल तर श्री रामाच्या प्राणप्रतिष्ठेसाठी सरकारने घाई का केली हा एक कुतुहालाचा विषय आहे. भल्या थोरल्या प्रतीक्षेनंतर खा. श्री उदयनराजेंची उमेदवारी जाहीर झाली त्यामुळे सातारा मतदारसंघातील उकाड्याने त्रस्त झालेली जनता नक्कीच सुखावली असणार कारण तो सातारकरांच्या अस्मितेचा आत्मसन्मानाचा प्रश्न आहे परंतु ह्या निवडणुकीची प्रश्नपत्रिका सोडवताना महाराज साहेबांची दमछाक मात्र नक्की होणार. यापूर्वी याच मतदारसंघातील लोकांनी राजांवर भरभरून प्रेम केलं, दोन वेळा खासदार, आमदार, राज्यमंत्री, त्यांच्या इच्छेप्रमाणे पक्ष, लोकांनी कायमच खा. उदयनराजेंची मर्जी राखली. या निवडणुकीला सामोरे जाताना राजांच्या मागील कारभाराचं प्रगतीपुस्तक अग्रक्रमाने तपासले जाणार हे मात्र खरं आहे. केंद्रातील, राज्यातील सरकारच्या कारभाराने राजकीय वातावरण इतकं ढवळून निघालयं, तापलंय की जनतेचा मूड पूर्णपणे बदलला आहे. या निवडणुकीत खा. श्री उदयनराजांच्या नावाची जादू चालेल असं वाटत नाही कारण सातारा जिल्हा विकासाच्या बाबतीत प्रचंड पिछाडीवर आहे. आजमितीला साताऱ्यातील सर्वांगसुंदर चखऊ ला विराण स्वरूप आलेलं आहे, मोठमोठ्या कंपन्यांनी चखऊ ला रामराम केला कायदा व सुव्यवस्थेचे जिल्ह्यात तीन-तेरा केव्हाच वाजलेत, शैक्षणिक सोयी सुविधांच्या बाबतीत जिल्हा खूपच मागे आहे, जिल्ह्यात उच्चप्रतीच्या आरोग्य सुविधा नाहीत, जिल्ह्याच्या उशाला ३ - ३ धरणं असून सुद्धा बराचसा भाग दुष्काळाच्या झळा सोसतोय, जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यापेक्षा स्वतः च्या स्वार्थाकर्ता सत्ताधाऱ्यांच्यात कळवंड लगलेली दिसते.एकंदरीत ह्या निवडणुकीत राजांचा प्रवास खूपच खडतर असणार आहे, मतदार संघातील जनता ह्या सर्व गोष्टींचा लेखाजोखा निश्चित मांडणार कारण या अगोदरच्या प्रत्येक निवडणुकीत आपल्यासह अनेकजण छत्रपती श्री उदयनराजांचे मतदार राहिलेले आहेत.

कल्याण पिसाळ देशमुख, ओझर्डे

- सरचिटणीस,

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी.

९८५०४१२९०९

# विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्षाची सुरवात १३ जूनपासून!

## परीक्षा लांबल्याने विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्ट्या कमी;

**सुटीतही विद्यार्थ्यांना फोटो कॉपीसाठी मारावे लागणार हेलपाटे**

**सोलापूर :** २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्राची परीक्षा लांबल्याने विद्यार्थ्यांना ऐन उन्हाळा सुटीत देखील निकालाच्या (फोटोकॉपी, निकालातील त्रुटी) अनुषंगाने विद्यापीठात किंवा महाविद्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागणार आहेत. सध्या सुरू असलेल्या परीक्षा ३० मेपर्यंत चालणार आहेत. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची परीक्षा ९ मेपासून सुरू होतील, त्यात अभियांत्रिकीच्या परीक्षा १३ मेपासून सुरू होऊन मेअखेरीस संपणार आहे.

कोरोनापासून विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक अजूनही रूळावर आलेले नाही. दोन सत्र परीक्षांमध्ये किमान ९० दिवसांचे अंतर अपेक्षित आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या परीक्षेचे नियोजन दोनवेळा बदलावे लागले. आता साधारणत: उच्च महाविद्यालयांना ३० मेनंतरच सुट्या लागतील अशी सद्य:स्थिती आहे. त्यानंतर लगेचच १३ जूनपासून विद्यापीठाचे सत्र सुरू होणार आहे. परीक्षा विलंबाने सुरू झाल्याने निकाल मेअखेरीस व जूनमध्ये जाहीर होणार असल्याने विद्यार्थ्यांना फोटोकॉपी व उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनासाठी त्या सुट्यामध्येच अर्ज करावा लागणार आहे. आता हा गोंधळ आगामी शैक्षणिक वर्षात तरी सुधारेल अशी विद्यापीठ संकुलासह संलग्नित १०८ महाविद्यालयांमधील ६८ ते ७० हजार विद्यार्थ्यांना आहे.

**आगामी शैक्षणिक वर्षाची सुरवात १५ जूनपूर्वी**

**सध्या सुरू असलेली सत्र परीक्षा मेअखेरीस संपणार असून त्यानंतर कमीत कमी कालावधीत निकाल जाहीर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आगामी शैक्षणिक वर्ष १५ जूनपूर्वी सुरू होईल.**

**- डॉ. श्रीकांत अंधारे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ**

**निवडणुकीमुळे ६ ते ८ मे रोजी पेपरला सुट्या**

जिल्ह्यातील सोलापूर व माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर गॅट, सेट परीक्षा देखील आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ६ ते ८ मे या काळात सुटी असणार आहे. दरम्यान, परीक्षा विलंबाने सुरू झाल्या असल्या तरीदेखील रविवारी पेपर घेण्यात येत नाही. प्रत्येक पेपरसाठी विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना एक दिवसाची सुटी दिली जात आहे. दररोज तीन सत्रात परीक्षा होत आहे. पण, निवडणुकीच्या प्रशिक्षणामुळे मागील आठवड्यात विद्यापीठाला मनुष्यबळाअभावी दोन पेपर पुढे ढकलावे लागले. त्यामुळे देखील उन्हाळा सुट्यांवर परिणाम होणार आहे.

**ठळक बाबी...**

- निकालानंतर पहिल्या दहा दिवसांत फोटोकॉपीसाठी अर्ज करणे बंधनकारक; त्यानंतर विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांत पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे आवश्यक.
- शेवटचा पेपर संपल्यानंतर ३० ते ४५ दिवसांत निकाल लावण्याचा नियम; यंदा पहिल्यांदा प्रथम (अभियांत्रिकी) व अंतिम (सर्वच अभ्यासक्रम) वर्षांचे निकाल लावण्याचे नियोजन
- पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा ९ मेपासून सुरू होणार असून अभियांत्रिकीची परीक्षा १३ मेपासून सुरू होईल आणि मेअखेरीस संपणार आहे. परीक्षा संपल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना उन्हाळा सुटी
- ५ एप्रिलपासून परीक्षा सुरू झाली असून ज्यांची परीक्षा संपेल त्यांना त्या दिवसापासून उन्हाळा सुटी, आगामी शैक्षणिक वर्षाची सुरवात १३ जूनपासून करण्याचे विद्यापीठाचे नियोजन

**एकूण संलग्नित महाविद्यालये**
**१०८**
**एकूण परीक्षार्थी विद्यार्थी**
**६८ ते ७०,०००**
**परीक्षेचा कालावधी**
**५ एप्रिल ते ३० मे**
**एकूण कोर्सेस**
**१४४**

# टंचाई निवारणार्थ १९.४४ कोटी रुपयांचा कृती आराखडा मंजूर

**हिमायतनगर :** तालुक्यातील पाणीटंचाई निवारणार्थ जानेवारी ते मार्च २०२४ , एप्रिल ते जून २०२४ या कालावधीसाठी ग्रामीण पाणीटंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून, त्यानुसार आराखड्यातील उपाययोजना आवश्यकतेनुसार तत्काळ हाती घेण्याच्या सूचना वरिष्ठांकडून देण्यात आल्याची माहिती उपअभियंता सतीश हिरप यांनी दिली.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विकास आराखड्यानुसार नवीन विंधन विहीर घेणे यासाठी अपेक्षित खर्च प्रती गाव ९० हजार रुपये असून, यामध्ये वडगाव तांडा वडगाव अबादी, धानोरा ज., कार्ला पी., रमनवाडी, बोरगडी तांडा न. २,

कांडली खु., विरसनी २, पिंपरी, दुधड, वाळकेवाडी, वाळकेवाडी २, रामबापूनगर, वडाची वाडी, पार्डी ज., खैरगाव ज., लाईनतांडा, बोधनतांडा, एकंबा, पवना २, पवनातांडा, दस्तगीरवाडी, पावनमारी, पारवा खु., सवना ज.,

महादापूर, सिरंजनी, टेंभी, पारवा बु., फूलसिंग तांडा, एकघरी, बळीराम तांडा, आदी गावांचा समावेश आहे. तसेच विंधन विहीर विशेष दुरुस्तीसाठी अपेक्षित खर्च २० हजार यात वडगाव ज., वडगाव तांडा, वडगाव अबादी, धानोरा ज., कार्ला पी., पिछोंडी जवळगाव, स्टेशन अबादी, एकघरी, रमनवाडी, बोरगडी,

बोरगडी तांडा न. १, २, कांडली खु., विरसनी, पिंपरी, दुधड, वाळकेवाडी, रामबापूनगर, वडाची वाडी, पार्डी ज., दरेसरसम, करंजी, चिंचोर्डी, दगडवाडी, खैरगाव ज., लाईनतांडा, बोधनतांडा, एकंबा, पवना, पवनातांडा, दस्तगीरवाडी,

टेंभूर्णी, पावनमारी, पारवा खु., सवना ज. महादापूर, सिरंजनी, टेंभी, शिबदरा ज., सरसम बु., इंद्रनगर, कोतलवाडी व तांडा, पारवा बु, मोरगाव, कांडली बु., कोकातांडा, वटफळी, बळीराम तांडा या गावांचा समावेश असून विहीर अधिग्रहण करणे यासाठी अपेक्षित खर्च प्रती गाव ५४ हजार रूपये तरतूद करण्यात आली आहे.

यामध्ये पिछोंडी, बोरगडी, दुधड, वाळकेवाडी, पारडी ज, दगडवाडी, खैरगाव ज, बोधनतांडा, टेंभूर्णी, पावनमारी, महादापूर, टेंभी, सरसम बु, इंदिरानगर, फूलसिंग तांडा, बळीराम तांडा, मंगरूळ, सोनारी, घारापूर, सिरपल्ली, शेल्लोडा, गणेश वाडी, टाकराळा बु, मानसिंग तांडा, वारंगटाकळी, भोडणीतांडा, काळूनाईक तांडा, कामारवाडी, कौठा ज, कौठावाडी, कौठा तांडा, खैरगाव ता, पोटातांडा, वाशी, बळीराम तांडा आदी गावांचा समावेश आहे. याकरिता १९ कोटी ४४ लाख रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली असून, मार्च २०२४ ते एप्रिल ते जून महिन्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाई निवारणासाठी हा खर्च करण्यात येणार आहे अशी माहिती पाणीपुरवठ्याचे अभियंता हिरप यांनी दिली आहे.

# दिंडोरीमध्ये महाविकास आघाडीत बिघाडी, जे पी गावित लोकसभा लढवण्यावर ठाम

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाकडून पुन्हा एकदा विद्यमान खासदार डॉ. भारती पवार (ऊी इहर्रींळ झुरुी) यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून भास्कर भगरे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. मात्र आता दिंडोरी मतदारसंघावर महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे.

माकपचे माजी आमदार जे. पी. गावित हे दिंडोरीतून लोकसभा निवडणूक लढविण्यावर ठाम आहेत. उद्या दिंडोरीमध्ये (ऊळपवींळ छशुी) त्यांची जाहीर सभा होणार आहे. शेतकरी संवाद सभा घेऊन ते आपली भूमिका मांडणार आहेत. जे पी पवार जाहीर सभेतून नक्की काय बोलणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दिंडोरीमध्ये होणार तिरंगी लढत**

जे पी गावित यांच्या भूमिकेमुळे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांची डोकेदुखी वाढणार आहे. आता दिंडोरीमध्ये तिरंगी लढत होणार आहे. भारती पवार, भास्कर भगरे आणि जे पी गावित असा सामना होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत नक्की कोण बाजी मारणार? हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

**...म्हणून नाराज गावित निवडणुकीच्या रिंगणात**

दरम्यान, माकपचे नेते माजी आमदार जे. पी. गावित यांनी सातत्याने भाजपच्या (इगझ) विरोधात लढा दिला आहे. महाविकास आघाडीच्या प्रत्येक आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. लोकसभा निवडणुकीत दिंडोरी मतदारसंघ माकपला मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, महाविकास आघाडीच्या जागावाटपात ती मागणी मान्य झालेली नाही. त्यामुळे आता नाराज गावित हे आता निवडणूक लढवणार आहेत.

**कोण आहेत जे पी गावित?**

जे पी गावित हे सुरगाणा व कळवण येथून तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. २०१४ मध्ये त्यांना महाराष्ट्र विधानसभेचे तात्पुरते अध्यक्ष नेमण्यात आले होते. गावित हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आहेत. व महाराष्ट्राच्या १३ व्या विधानसभेतील एकमेव डाव्या गटातील सदस्य आहेत.

# मंत्री दादा भुसेंची पाठिंब्यासाठी मुरकुटेंना गळ



**श्रीरामपूर :** मंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी सायंकाळी अशोक सहकारी साखर कारखान्यावर माजी आमदार भानुदास मुरकुटे यांची अचानक भेट घेतली. शिर्डीचेमहायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांना पाठिंब्यासाठी भुसे यांनी मुरकुटेंना गळ घातली. मात्र या भेटीनंतर मुरकुटे यांनी भुसे यांना आश्वासन दिलेले नाही. जाहीर मेळाव्याद्वारे व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनचशिर्डीतकोणाला पाठिंबा द्यायचा हे ठरवू असे मुरकुटे यांचे म्हणणे आहे.

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी मुरकुटे यांचे राजकीय वैर आहे. महायुतीच्या येथे झालेल्या मेळाव्यात विखे यांनी मुरकुटेंवर टीका केली होती. मुरकुटे यांनीही त्याला प्रत्युत्तर दिले होते. त्यामुळे भुसे यांनी ही भेट घेतल्याची चर्चा आहे. यावेळी माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, सिद्धार्थ मुरकुटे उपस्थित होते.माजी आमदार मुरकुटे हे बीआरएस पक्षामध्ये होते. मात्र तेलंगणामध्ये बीआरएसचा पराभव झाला. त्यानंतर मात्र मुरकुटे यांनी कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश केलेला नाही. महायुतीचे उमेदवार लोखंडे यांना मुरकुटे यांचा पाठिंबा आवश्यक आहे. विरोधी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे हेदेखील मुरकुटे यांच्या संपर्कात आहेत. तेही लवकरच मुरकुटे यांची भेट घेणार आहेत. मुरकुटे यांनीच तशी माहिती दिली.

## जनतेच्या न्यायालयातील लढाई नवनीत राणांसाठी अग्निदिव्य ठरणार

**अमरावती :** अमरावती लोकसभा मतदारसंघात भाजप, काँग्रेस आणि प्रहार जनशक्ती पक्षात चुरशीची लढत होत आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर अपक्ष निवडून आलेल्या नवनीत राणा यांनी गेली पाच वर्षे केंद्र सरकारला दिलेला पाठिंबा, भाजपमध्ये नाट्यमय प्रवेश, लगेच उमेदवारी आणि जात प्रमाणपत्र प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला दिलासा, यामुळे आत्मविश्वास दुणावलेल्या राणांना जनतेच्या न्यायालयात अग्निदिव्य पार करावे लागणार आहे.

# अकोल्यात वंचितला एमआयएमचा पाठिंबा



पुण्यातही उमेदवार देणार; असोद्दीन ओवैसी यांची घोषणा

छत्रपती संभाजीनगर - भलेही आमची आता त्यांच्याबरोबर युती नसेल. पण अकोला लोकसभा मतदारसंघातून प्रकाश आंबेडकर यांना निवडून आणण्यासाठी एमआयएम पूर्ण मदत करेल, असे एमआयएमचे प्रमुख असोद्दीन ओवैसी यांनी मंगळवारी औरंगाबाद येथे सांगितले. अकोला लोकसभा मतदार संघातह वंचितला पाठिंबा देताना पुणे येथेही उमेदवार उभा केला जाईल, असे त्यांनी जाहीर केले.

ते म्हणाले, जरी आता आमची वंचित बरोबर युती नसेल तरी दलित आणि वंचित समाजाचे नेतृत्व असावे, हे आमचे मत आहे आणि म्हणून अकोल्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना आवाहन करतो की त्यांनी प्रकाश आंबेडकरांना विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत. गेल्या काही महिन्यात एका किरकोळ शरीरयष्टीच्या माणसाने महाराष्ट्रातील सर्व प्रमुख नेत्यांना हादरवून टाकले.

मनेज जरांगे यांनी त्यांच्या समाजाच्या उन्नतीसाठी जे काही केले आहे, ते एखादा 'दिवानाच' करू शकतो. असा ध्येयवेडेपणा नक्की असायला हवा. म्हणूनच त्यांना माझं आवाहन आहे की, त्यांनी त्यांचा स्वतंत्र पक्ष स्थापन करावा. कारण लोकशाहीत मतदान मिळविणे आणि त्याचे नेतृत्व उभं करणे यातूनच विकास घडत असतो. त्यामुळे जरांगे यांनी त्यांच्या पक्ष स्थापन करावा, असे आवाहनही ओवैसी यांनी केले. एमआयएमच्या विजयी उमेदवाराला हरवण्यासाठी साडे पाच पक्ष मैदानात उतरले आहेत. दोन राष्ट्रवादी, दोन शिवसेना आणि अर्धी काँग्रेस या साडे पाच पक्षांसमोरही औरंगाबादचा खासदार टिकून राहील, असे ते म्हणाले. त्यांनी यावेळी समान नागरी कायदा, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदी या कायद्यान्वरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली. मात्र, टीकेचा रोख उद्धव ठाकरे गटाकडे अधिक होता. गेल्या तीस वर्षांत काहीही काम न करणाऱ्या लोकप्रतिनिधीने माझी ही शेवटची निवडणूक आहे, असे म्हटले आहे. खरं तर त्यांची निवडणूक २०१९ मध्येच शेवटची होती.

# पंतप्रधान मोदींच्या वर्धेतील सभेच्या पूर्वसंध्येला 'अक्षता' वाटप



**वर्धा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १९ एप्रिल रोजी तळेगाव येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. वर्धेचे रामदास तडस व अमरावतीच्या नवनीत राणा या दोन उमेदवारांसाठी ही सभा होणार आहे. सभेची पूर्वतयारी म्हणून आमदार दादाराव केचे यांनी सभास्थळाचे कलश पूजन केले होते. संस्कृती व परंपरा यावर निस्सीम श्रद्धा ठेवून सर्व आखणी होत आहे. म्हणजेच, विवाहाप्रसंगी जशा मानसन्मान म्हणून अक्षता दिल्या जातात, तशाच अक्षता वाटपाचा विधी आज संध्याकाळी पार पडला.

या सभेचे नियोजन यथोचित व्हावे म्हणून उच्चस्तरावरून समिती गठीत झाली. क्षेत्रप्रचारक सुमित वानखेडे, भाजप जिल्हा महासचिव अविनाश देव व किशोर दिघे हे तिघे सभेच्या यशस्वीतेस जबाबदार राहणार. वानखेडे यांना सभास्थळी म्हणजे तळेगाव येथे पूर्णवेळ थांबून समन्वय साधायचा आहे. व्यासपीठ सुशोभीकरण, माईक व प्रक्षेपण, पत्रकार, व्ही.आई.पी. कक्ष, व्यासपीठावरील निमंत्रित, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची आतिथ्य व अन्य जबाबदाऱ्या आहेत. अविनाश देव हे वर्धा मुख्यालयी थांबून पासेस, सुरक्षा यंत्रणाशी समन्वय, वर्धेतून जाणाऱ्या गाड्या, पदाधिकारी संवाद, बाहेरून येणाऱ्या नेत्यांचे स्वागत, भोजन व तत्सम काम पाहणार.

किशोर दिघे हे प्रामुख्याने गर्दीचे नियोजन करणार. मी इतके आणले, सांगणाऱ्या नेत्याचा हिशेब ठेवणार. आर्वी वागळता उर्वरित विधानसभा क्षेत्रातून प्रत्येकी तीनशे गाड्या भरून आणण्याचे लक्ष्य आहे. येणाऱ्या गाड्या व त्यात येणारे समर्थक, ब्लॉक पातळीवरून येणारे, आर्वीतून जमा गर्दी, जमलेल्या वाहनांचे क्रमांक, त्याचे पैसे कोण देणार, पार्किंग, वाहनचालक व त्याची व्यवस्था, दुचाकीने येणारे, स्वयंस्फूर्त, सभेच्या कोणत्या भागात किती बसणार, महिलांची व्यवस्था, पेयजल पुरवठा, नारेबाजी, दुपट्टे उंचावणे, अशी व अन्य जबाबदारी देण्यात आली आहे.

या सभेत कुठेही उणीव राहू नये म्हणून हे तिघे रात्रभर वरिष्ठांच्या संपर्कात राहतील. सभेसाठी विशेष संपर्क यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. त्याची रात्रभर उजळणी होणार. सुरक्षा अधिकारी वर्गाशी संवाद साधून कुठेही गडबड होवू नये म्हणून अपेक्षित दक्षता घेतल्या जात आहेत. सभेसाठी जिल्ह्याबाहेरून किती लोकं येणार हे आज रात्री निश्चित होईल.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# बारामतीत ‘बसपा’चा उमेदवार ठरला; प्रियदर्शनी कोकरे यांचा अर्ज दाखल

■ बारामती ‘बसपा’कडून सोशल इंजिअरिंग, धनगर समाजाला उमेदवारी

**बारामती/ प्रतिनिधी**

बारामती येथील ॲड. प्रियदर्शनी कोकरे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात बहुजन समाज पार्टीच्या वतीने आज उमेदवारी अर्ज दाखल केला. बहुजन समाज पक्षाने सोशल इंजिनिअरिंग करत धनगर समाजातील कोकरे यांना उमेदवारी दिल्याने सर्वच पक्षांना धक्का दिला आहे. त्यामुळे बारामती मतदार संघात लढत आणखी रंगतदार होणार आहे. वंचित बहुजन आघाडीने बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये उमेदवार उभा करता खासदार सुप्रिया सुळे यांना पाठिंबा दिला आहे. या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पक्ष कोणाला उमेदवारी देणार, याची उत्सुकता होती.



बहुजन समाज पार्टीने धनगर समाजातील युवतीला उमेदवारी दिल्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघातील धनगर समाजातील मतदार आपल्याकडे खेचण्याची बहुजन समाज पक्षाची रणनीती असून कोकरे यांच्या उमेदवारीचा फटका कोणाला बसणार, हे येत्या काही दिवसात स्पष्ट होणार आहे. प्रियदर्शनी कोकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी बसपाचे महाराष्ट्र सचिव हुलगेश चलवादी, पश्चिम महाराष्ट्राचे झोन प्रभारी काळुराम चौधरी, यशवंत ब्रिगेड चे अध्यक्ष बापूराव सोलनकर,सारिकाताई भुजबळ, संपतराव टकले आदी उपस्थित होते.

## मुरलीधर मोहोळ यांच्याविरुद्ध काँग्रेसतर्फे आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या विरुद्ध काँग्रेसतर्फे आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल करण्यात आली आहे. मुरलीधर मोहोळ यांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून ‘‘राम मंदिर झाले आता राष्ट्रमंदिरासाठी संकल्प करूयात‘‘ या मथळ्याखाली जाहिरात करून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अयोध्येतील राममूर्तीच्या पाया पडत आहेत असे छायाचित्र असलेली पत्रके वाटली.

याप्रकरणी माजी आमदार मोहन जोशी व काँग्रेसचे सोशल मीडिया राज्य समन्वयक चैतन्य पुरंदरे यांनी सांगितले की, ‘‘ राम मंदिराला निवडणुक प्रचाराचा मुद्दा बनवून याद्वारे धार्मिक प्रलोभन दाखवून मोहोळ यांनी मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे.‘‘

आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी पुरंदरे यांनी मोहोळ यांच्या विरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्यावर निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने पुरंदरे यांची भेट घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# ‘एमआयएम’चे अनिस सुंडके यांची उमेदवारी पराभवाच्या भीतीपोटी

### भाजपाचे पडद्यामागील षड्‌यंत्र - ॲड. अभय छाजेड

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांना जनतेतून प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत असल्यामुळे, एमआयएमचे अनिस सुंडके यांची उमेदवारी जाहीर करण्याचे पडद्यामागील षडयंत्र भारतीय जनता पक्षाने रचले असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. अभय छाजेड यांनी केला.

ॲड. अभय छाजेड म्हणाले, अनिस सुंडके हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजित पवार गट ) यामध्ये होते पुण्यात भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा पराभव होण्याच्या शक्यतेच्या भीतीपोटी भाजपाने अनिस सुंडके यांचा एमआयएममध्ये प्रवेश घडवून आणला. त्यांना एमआयएमतर्फे पुण्यात उमेदवारी



मिळेल अशी व्यवस्था केली हे स्पष्ट दिसत आहे. अनिस सुंडके यांनी अनेक वेळा सोयीस्कर भूमिका घेऊन पक्ष बदलले आहेत. त्यामुळेच त्यांच्या पक्षनिष्ठेबद्दल प्रश्नचिन्ह उभे राहिले असून अशा एमआयएम उमेदवाराला मुस्लीम समाज मतदान करणार नाही. काँग्रेस पक्षाने बहुसंख्यांकां प्रमाणेच अल्पसंख्यांक समाजासाठी देखील मोठे योगदान दिले असून, त्यामुळे अल्पसंख्यांकांची मते देखील काँग्रेस पक्षाला पडतील आणि भाजपाचे एमआयएम चा उमेदवार पुण्यात उभा करण्याचे षडयंत्र अयशस्वी होईल. महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर मोठ्या मताधिक्क्याने विजयी होतील, असा विश्वास ॲड. अभय छाजेड यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, तेलंगणा विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस पास्खला रोखण्यासाठी भाजपाने एमआयएमचे अनेक उमेदवार तिथल्या काँग्रेस विरोधी उभे करण्याचे षडयंत्र रचले होते. एमआयएम हा पक्ष भाजपचा इ टीम म्हणून ओळखला जातो. देशामध्ये भाजपाने याच इ टीमचा वापर केला आहे, मात्र, देशात आणि तेलंगणामध्ये देखील त्याचा फायदा भाजपाला झाला नाही. तेलंगणामध्ये एमआयएमचे अनेक उमेदवार उभे करायला लाऊनाही काँग्रेस पक्ष सगळीकडे विजयी झाला व भाजपाचे मनसुबे धुळीस मिळाले, पुण्यातही असेच घडेल, असा विश्वास ॲड. अभय छाजेड यांनी व्यक्त केला.

# उमेदवारांच्या निवडणूक खर्चविषयक नोंदी काटेकोर ठेवा

### निवडणूक खर्च निरीक्षक सुधांशू राय

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर नियुक्त निवडणूक खर्च विषयक कक्षातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी विहित नमुन्यातील नोंदी तसेच उमेदवारांनी दिलेल्या खर्चाच्या माहितीच्या नोंदींची पडताळणी करावी आणि नोंदवह्या काटेकोरपणे अद्ययावत ठेवाव्यात, असे निर्देश मावळ लोकसभा विधानसभा मतदार संघासाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक सुधांशू राय यांनी दिले.



मावळ लोकसभा मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाकडून नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक राय यांनी आकुर्डी पुणे येथील पीएमआरडीए प्रशासकीय भवनातील मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट देवून कामकाजाची माहिती घेतली, त्यावेळी राय बोलत होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये स्थापित करण्यात आलेल्या विविध कक्षांची माहिती दिली. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले, समन्वय अधिकारी प्रविण ठाकरे, हिम्मत खराडे आदी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक खर्च संनियत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह मधील लेख्यांची तपासणी या तरतूदीनुसार उमेदवाराने ठेवलेल्या दैंनदिन खर्च विषयक लेख्यांची तपासणी करण्यात येत असते. त्या अनुषंगाने श्री. राय यांनी निवडणूक खर्च व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेवून विविध निर्देश दिले. निवडणूक खर्चाची नोंद योग्य पद्धतीने घेवून प्रत्येक नोंदी अद्ययावत ठेवाव्या, बँकांकडून प्राप्त झालेल्या तपशीलाची माहिती संकलीत करावी, विविध भरारी पथके सातत्याने कार्यान्वीत ठेवून प्रत्येक बाबीची बारकाईने तपासणी करावी, अशा सूचना राय यांनी यावेळी दिल्या.

राय यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील माध्यम कक्ष, एक खिडकी कक्ष, आचार संहिता कक्ष, निवडणूक खर्च व्यवस्थापन कक्ष, कायदा व सुव्यवस्था कक्ष, टपाली मतदान कक्ष अशा विविध कक्षामध्ये प्रत्यक्ष भेट देवून येथील कामकाजाची माहिती घेतली.

यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या निवडणूक खर्च तपासणी पथक प्रमुख अश्विनी मुसळे, निवडणूक निरीक्षक समन्वय कक्षाचे प्रमुख प्रमोद ओभासे, समन्वय सुरेंद्र देशमुखे, सचिन चाटे आदी उपस्थित होते.

# बारामती वकील संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. प्रभाकर बर्डे यांची निवड

**राजदंड / बारामती**

बारामती वकील संघटनेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲड. प्रभाकर बर्डे यांनी विजय मिळविला. प्रभाकर बर्डे यांना ३९५ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी ॲड. नितीन भामे यांना ३५२ मते मिळाली. ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली.

उपाध्यक्षपदी ॲड. सचिन कोकणे व ॲड. प्रीती शिंदे यांची बिनविरोध निवड झाली.बारामती वकील संघटनेची सन २०२४ -२५ ची निवडणूक प्रक्रिया दि(१६) रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

अध्यक्षपदासाठी ॲड. प्रभाकर बर्डे, ॲड. नितीन भामे व ॲड. अविनाश गायकवाड उभे होते.

सचिवपदी ॲड. दीपक शिवाजी लोंढे , सहसचिव पदी ॲड.सुजित आप्पासो सांगळे, खजिनदारपदी ॲड. सूरज महादेव बनकर . ग्रंथपालपदी ॲड. महावीर मुकुंद मदने, तर महिला प्रतिनिधी म्हणून ॲड. प्रतिमा विजय गावडे - पवार यांची निवड झाली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. आर, डी काटे, एस एस जगताप, संजय टकले, सुनील आटोळे, नंदकुमार भागवत, नितीन अवचट,रजकिरण शिंदे, श्रीकांत काटे, सोहेल शेख, सोनाली जगताप यांनी यांनी काम पाहिले.



> “ **बारामती वकील संघटनेतील सदस्यांनी मला अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी सर्व सदस्यांचा आभारी आहे. मिळालेल्या संधीच्या माध्यमातून बारामती वकील संघटनेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन प्रयत्नशील राहणार आहे.**
>
> **– ॲड. प्रभाकर बर्डे, नवनिर्वाचित अध्यक्ष, बारामती वकील संघटना**

पान १ वरून

## सुप्रिया सुळे यांनी दाखल केला...

महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या साक्षीने दाखल केला. आपल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील जनतेचे आशीर्वाद, शुभेच्छा, अतूट विश्वास आणि भरघोस पाठबळ यांच्या जोरावर मला पुन्हा या मतदारसंघाचे लोकसभेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळेल हा विश्वास आहे. मायबाप जनतेची सेवा, महिला, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांचा सन्मान आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान कायम बुलंद राखण्यासाठी मी लढत आहे. या लढतीत मायबाप जनता माझ्या सोबत राहिल याची मला खात्री आहे. तत्पूर्वी त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आशीर्वाद घेऊन मी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होत आहे‘‘ अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## मोदींचा पराभव करायला तयार रहा!

त्यावेळी पवार बोलत होते. यावेळी पवार यांनी नरेंद्र मोदी, भाजप सरकारवर हल्ला चढवला. काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात, डॉ. विश्वजित कदम, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आदी या वेळी उपस्थित होत्या. देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाची असल्याचे मोदी सांगतात. पण, डॉ. मनमोहनसिंग यांनी पाया घातला होता. मोदींच्या निर्णयाने अर्थव्यवस्था कोसळली. खतापासून पेट्रोलपंपापर्यंत सगळीकडे मोदींचा फोटो लावला जातो. आमदार पळाले असले तरी मतदार त्यांच्या जागी आहेत. जनता त्यांना त्यांची जागा दाखवून देईल, असे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. पुण्यातल्या तीन उमेदवारांकडे देशाचे लक्ष लागले आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार विजयी झाले पाहिजे. त्यानंतर मुख्यमंत्रीही महाविकास आघाडीचा झाला पाहिजे, असे बाळासाहेब थोरात म्हणाले.

## अजिंक्यतारा कारखान्यावर गोळीबार..

येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यातील रेणुका शुगर मिलच्या यार्डमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. बुधवारी वादावादी आणि जुन्या भांडणाच्या कारणावरून शुभम चव्हाण यांनी पिस्टलमधून गोळी झाडली. ही गोळी शिंदे यांच्या छातीत लागली. त्यांना जखमी अवस्थेत सातारा येथील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सातारा तालुका पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री वेगाने हालचाल करून शुभम चव्हाण याला ताब्यात घेतले. सातारा तालुका पोलीस ठाण्यात त्याच्यावर खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पिस्टल मधून झाडलेली गोळी मृत शिंदे यांच्या छातीत डाव्या बाजूला लागली होती. त्या ठिकाणी खोल जखम होऊन रक्तस्त्राव झाला. संशयित हा यार्डमध्येच कामाला होता, कोणत्या कारणातून शिंदे व चव्हाण यांच्यात नक्की वादावादी झाली, याचा पोलीस अधिक तपास करत आहेत.


# भोरच्या संस्थानकालीन राजवाड्यात शाही थाटात रामजन्म सोहळा

### पालखीतून मिरवणूक... हजारो भाविकांना सुंठवडा वाटप...

**भोर/प्रतिनिधी**

सुमारे ३०० वर्षांची परंपरा असलेल्या भोर संस्थानच्या राजवाडा सभागृहात पंतसचिवांचे कुलदै वत असलेल्या प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव मिरवणूक काढून,पुष्पवृष्टी करत तुतारीच्या निनादात राम नामाचा जयघोष करीत शाही थाटात दुपारी.१२ वाजता मोठ्या भक्तिभावाने उस्ताहत करण्यात आला.

या जन्मोस्तावसाठी भोरचे राजे कै. आबाराजे पंतसचिवांच्या पत्नी उर्मिलादेवी पुत्र राजेशराजे पंतसचिव, पार्थराजे पंतसचिव, योगेशराजे पंतसचिव, स्वातीदेवी, यांच्यासह तहसीलदार सचिन पाटील, पोलीस निरिक्षक आण्णासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण, दत्तात्रय खेंगरे, स्वरुपा थोपटे, निर्मला आवारे, स्वाती गांधी, प्रमोद गुजर, विकास मांढरे, जगदीश किरवे,चंद्रकांत सागळे, समीर घोडेकर, सचिन मांडके, जतीन गुजराथी, गजानन झगडे, यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.





सकाळी ११ वाजता राजप्रसादातून राज घराण्यातील प्रमूख व्यक्ती व नागरिकांसह बॅडबाजा च्या थाप्यासह सोनाराकडे मूर्ती आणण्यासाठी गेले व पुष्पवृष्ठी करुण मोठ्या भक्तिभावाने मिरवणुक काढली व राजवाड्यात आणली. त्यानंतर मुर्ती सजवलेल्या पाळण्यात ठेवली पंतसचिव राजवाड्यातील मुख्य सभामंडपात आकर्षक झुंबर, हंड्या,फुलांची केलेली सजावटीत राजेशाही उत्सवाचं प्रतिबिंब पहावयास मिळाले.यावेळी राम जन्माचा पाळणा म्हणाला व ठीक १२ वाजता राजेशराजे पंतसचिव व त्यांचा भावांनी, मुलांनी पाळण्याची दोरी ओढून राम नामाचा जय जयकार केला.सभागृह राम नामाच्या जयघोषाने व तुतारीच्या निनादाने दणाणून गेले होते. नंतर सुंठवडा वाटप करण्यात आला.आलेल्या भावि कांसाठी जेवणावळीचे आयोजन करण्यात आले त्याचा स्वाद शहरासह खोडोपाड्यातून आलेल्या नागरिकांनी घेतला.

## मेढा, जावली, वाई परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

(पान १ वरून)

रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते. या पावसाने मेढा, कुडाळ, करहर, केळघर रस्त्यावरील चौकाचौकात पाण्याची तळी साचल्याचे दिसून आले.दरम्यान, वाई, जावळी परिसरातही दुपारी ढगांच्या गडगडाटात एक तास मुसळधार पाऊस झाला. पाचगणी, महाबळेश्वर व खंडाळा येथे हलका पाऊस झाला. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे लोक सुखावल्याचे दिसून आले.

उत्तर कोरेगाव परिसरातही जोरदार वारे वाहिल्याचे समजते. वाई, पाचवड रस्त्यावर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या पडल्या होत्या. जोरदार वारे वाहिल्यामुळे आंब्यांचा सडा रस्त्यावर पडला होता. वाई-सुरूर मार्गावर वादळी पाऊस व वाऱ्यामुळे झाड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत होऊन वाहनधारकांची गैरसोय झाली. खूप दिवसांनी पाऊस झाल्यामुळे दुपारी आलेला गारव्यानंतर सायंकाळी पुन्हा उकडा जाणवायला लागला.

## ज्यांना लेकीत अन् सुनेत अंतर वाटते, त्यांच्या पदरात धोंडे पडणार

(पान १ वरून) सत्यात उतरवण्यासाठी सुनेत्रा पवार यांना निवडून द्यावे लागेल. तीन उमेदवारांचे फॉर्म भरायला महाविकास आघाडीकडे आपल्यापेक्षा निम्मी गर्दी आहे. त्या तुलनेत आपला एक फॉर्म भरायला एवढी प्रचंड जनता येथे आली आहे, ही उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कामाची पोचपावती असून बारामतीमध्ये महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

बारामती लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील अशी दिग्गज मंडळी अर्ज भरताना पुण्यात आली होती. दुसरीकडे खासदार सुप्रिया सुळे यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, आता दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला गती मिळणार आहे.

# रामटेकडी येथे मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पाणपोईचे लोकार्पण

### स्व. परभज्योतसिंग फतेहसिंग कल्याणी यांच्या स्मरणार्थ पाणपोई



**हडपसर : प्रतिनिधी**

सध्या कडक उन्हाळा सुरु झाल्याने पिण्याच्या पाण्यासाठी तहान लागली की, अनेकांना पाणी बाटली विकत घेऊन पाणी प्यावे लागते तर अनेक गरिब तसेच फुटपाथ वरील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकावे लागते, अनेकांची माठातील थंडगार पाण्याने तहान भागविण्यासाठी रामटेकडी येथील सामाजिक कार्यकर्ते मानव सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष भगतसिंग कल्याणी , शक्तीसिंग कल्याणी रामटेकडी येथे पाणपोईचे उद्घाटन करून सामाजिक उपक्रम राबविला.

लोकअर्पण करण्यात आले मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्टचे कार्याध्यक्ष फतेहसिंग शक्तीसिंग कल्याणी यांचा मुलाचे अकास्मित निधन झाले. स्व.परभज्योतसिंग फतेहसिंग कल्याणी यांची आठवण म्हणून रामटेकडी येथे सिकलिकर समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक चांदसिंग अजितसिंग कल्याणी व बिजलकौर कल्याणी यांच्या हस्ते पाणीपोई सेवा चालू करण्यात आली जेणेकरून रामटेकडी डीपी रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या शेकडो नागरिकांना पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध होईल आणि कडाक्याच्या उन्हाळ्यात लोकांना थंडगार पाणी उपलब्ध व्हावं या उद्देशाने या ठिकाणी पाणीपोईची सुरुवात करण्यात आली यावेळी मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भगतसिंग कल्याणी, शक्तीसिंग कल्याणी सचिव कन्हैयासिंग कल्याणी, बलजीतसिंग भोंड, पवित्र सिंग भोंड, खन्नासिंग कल्याणी, सतसिंग कल्याण, युवराज कुचेकर, पंजाबसिंग टाक, बबलूसिंग टाक, रवींद्रसिंग भोंड, डब्लूसिंग टाक, व मोठ्या संख्येने महिला व पुरुष नागरिक उपस्थित होते.

## मेघगर्जनेसह खंडाळ्यात सुमारे एक तास अवकाळी पाऊस

(पान १ वरून)

दोन दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढली असून उष्म्याने असहाय्य झालेल्या नागरिकांना पावसाची प्रतिक्षा होती. बुधवारी दुपारपासून ढगाळ वातावरण तयार झाले होते. रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास वादळी वारे, विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पारगाव खंडाळ्यात सुमारे तासभर पाऊस झाला. त्याचप्रमाणे अजनूज, असवली, केसुर्डी, हरळी, घाटदरे, भोसलेवाडी आदी ठिकाणी कमी अधिक प्रमाणात पावसाच्या सरी बरसल्या आहेत.

रात्री झालेल्या वादळी पावसात केसुर्डीत घराचे पत्रे उडाले, तर भोसलेवाडी येथे शेतामध्ये काढलेले कांद्याचे पिक भिजल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला होता. मात्र दुसऱ्या दिवशी पुन्हा परिस्थिती ‘जैसे थे’ झाली.

# कारखाना चालवायला येत नाही, निघाले खासदार व्हायला

## अजितदादांनी विशाल पाटलांना डिवचलं

: महाविकास आघाडीमध्ये सांगली लोकसभा मतदारसंघात उमेदवारीवरुन तिढा वाढला आहे, तर महायुतीचे उमेदवार खासदार संजयकाका पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. संजयकाका पाटील यांनी आजसांगलीतशक्तिप्रदर्शन करत जाहीर सभा घेतली. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीअजित पवारउपस्थित होते.

यावेळी सभेत बोलतानाअजित पवारयांनी काँग्रेस नेतेविशाल पाटीलयांच्यावर जोरदार टीका केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीविशाल पाटीलयांना वसंतदादा पाटील सहकारी कारखान्यावरुन डिवचले. तर



महायुतीच्या कार्यकर्त्यांनाही लोकसभा निवडणुकीबाबत सूचना दिल्या.'काल अर्ज भरला त्यांना मी लहान असल्यापासून बघतोय...', सजंयकाकांचे विशाल पाटलांवर टीकास्त्रमागच्या काळामध्ये ज्यांनी साखर कारखाने चांगले काढले, वसंतदादांनीही साखर कारखाना चांगला काढला. त्या कारखान्याचं वाटोळ कुणी केलं, आज तुम्ही दुसऱ्याला चालवायला कारखाने देता. साखर कारखाना चालवायची तुमच्यामध्ये धमक नाही. आम्ही साखर कारखाने चांगले चा

वून दाखवतो, बँकांचं काय केलं? आज काय परिस्थिती आहे, अशी टीका अजित पवार यांनी विशाल पाटील यांच्यावर केली.इथं एवढी आर्थिक सुबत्ता होती आम्ही सगळे सांगलीच उदाहरण देत होतो,

सगळ्यात मोठा आमच्या महाराष्ट्रातील शेतकरी सहकारी साखर कारखाना नंतर तो वसंतदादा सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला गेला. पण, आता कोणतही दारु म्हणून तो कारखाना चालवतो आणि आम्ही त्यांच्या तोंडाकडे बघतो.

ही तुमची परिस्थिती आहे, तुम्हाला कारखाना चालवता येत नाही आणि खासदार व्हायला निघालाय याचा कुठेतरी विचार करा, असा टोलाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काँग्रेस नेते विशाल पाटील यांना लगावला. संजयकाका पाटील यांची विशाल पाटलांवर टीकासांगली लोकसभा मतदारसंघात आज महायुतीकडून भाजपाचे खासदारसंजयकाका पाटीलयांनी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते,

जाहीर सभेत बोलताना खासदार संजय पाटील यांनी काँग्रेसच्यावि शाल पाटीलयांच्यावर जोरदार टीका केली.सांगलीत दोन दिवसापूर्वी एक अपक्ष अर्ज भरला, त्यांना मी लहान असल्यापासून बघतोय. राजकारणातील परिपक्व नसलेलं नेतृत्व काय तर त्या मुलाकडे आपण सगळी बघतोय, असा टोला खासदार संजयकाका पाटीलयांनी काँग्रेसनेते विशाल पाटीलयांना लगावला.' त्यांनी मोठं मोठ्या वल्गना केल्या, घोषणा केल्या. त्यांनी १०, २० मुलांना ओरडायला लावलं, असा आरोपही संजयकाका पाटील यांनी केला.

# रथयात्रेमुळे वाहतूक मार्गात बदल

**नाशिक** : नाशिक : रामनवमीनंतर येणाऱ्या एकादशीला शहरातून रामरथ आणि गरूड रथ यांची रथयात्रा काढली जाते. त्यानुसार शुक्रवारी एकादशीनिमित्त रथयात्रा काढली जाणार असून रथयात्रेत सहभागी होण्यासाठी नाशिककर मोठ्या संख्येने गोदाकाठ परिसरात उपस्थित राहात असल्याने वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. ही कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाच्या वतीने रथ ज्या मार्गाने मार्गस्थ होईल, त्या मार्गावर वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

श्रीराम रथ मिरवणूक काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाज्यापासून नागचौक- चरण पादुका चौक-लक्ष्मण झुला पूल-काट्यामारूती - गणेशवाडी रोड- आयुर्वेदिक रुग्णालय- गौरी पटांगण- म्हसोबा पटांगण- कपालेश्वर मंदिर- परशुराम पुरीया रस्त्याने मालवीय चौक-शनीचौक- आखाडा तालीम-काळाराम मंदिर उत्तर दरवाजा ते काळाराम मंदिर पूर्व दरवाजा अशी निघणार आहे. श्री गरूडरथ मिरवणूक श्रीरामरथाबरोबर पुढे मार्गस्थ होते. यामुळे शुक्रवारी दुपारी दोनपासून मिरवणूक संपेपर्यंत हा मार्ग वाहतुकीसाठी प्रवेश बंद ठेवण्यात आला आहे.

# पन्हाळ्यावर पुरातत्व विभागाच्यावतीने जागतिक वारसा दिन उत्साहात साजरा

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा** : पन्हाळगडावरील ऐतिहासिक ईमारती सुस्थितीत आहेत त्यांच्या मुळे आणी येथील स्थानिक रहिवाशांनी या ईमारतींची देखभाल केल्याने पन्हाळा गड जागतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत गेल्याने पन्हाळगडाचे नाव जगाच्या नकाशात जाणार आहे. याचा चांगला फायदा पन्हाळा वासीयांना होणार असल्याचे प्रतिपादन पुरातत्व विभागाच्या प्रादेशिक संचालक श्रीमती दी.शुभलक्ष्मी यांनी केले त्या पुरातत्व विभागा मार्फत साजरा केलेल्या जागतिक वारसा दिन प्रसंगी बोलत होत्या.

वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश आहे. त्यामुळे पुरातत्व विभागाने पन्हाळ्यावरील ऐतिहासिक ईमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी व देखभालीसाठी विशेष आराखडा तयार करत असुन सध्या ईमारतींचे



**पुरातत्व वीभागा मार्फत जागतिक वारसा दिन प्रसंगी बोलताना पुरातत्व विभागाच्या प्रादेशिक संचालक श्रीमती दी.शुभलक्ष्मी व मान्यवर**

फोटोग्राफ, मोजमापे व स्ट्रक्चरल ऑडिट सुरू केले आहे पन्हाळा गडाची पाहणी करण्यासाठी युनेस्कोचा पहाणी दौरा सप्टेंबर महिन्यात गडाला भेट देणार आहे.

त्या अनुषंगाने पुरातत्व विभाग सज्ज असेल ऐतिहासिक व पौराणिक ठेवा असलेल्या ईमारती त्यांचे संवर्धन करून गडाला पूर्वीचे वैभव देण्यासाठी भारतीय पुरातत्वाविभाग सकारात्मक काम करेल पन्हाळगडावर नागरी वस्ती आहे. ऐतिहासिक ठेव्या बरोबरच येथील स्थानिक नागरिकही तितकेच महत्वाचे आहेत. त्यामुळे गडावर भविष्यात या संमंधाने राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, करण्यात येणाऱ्या बदलासाठी स्थानिक लोकांचे मत घेतले जाणार आहे.तसेच या सर्वांमध्ये स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाईल असे त्यांनी सांगितले.यावेळी पन्हाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन कुमार माळी, भारतीय पुरातत्त्वचे अधीक्षक सुभा मुजुमदार, संरक्षण सहायक बी.बी. जंगले, विजय चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष रविंद्र धडेल, रामानंद गोसावी,मारुती माने आदींसह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पन्हाळा नागरिक उपस्थित होते.

# काँग्रेसला धक्का! उत्कर्षा रुपवतेंचा वंचितमध्ये प्रवेश

## शिर्डीतून उमेदवारी मिळणार?

**अकोला** : महाविकास आघाडीकडूनशिर्डीलोकसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्याने नाराज असलेल्या उत्कर्षा रुपवते यांनी काल काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतरवंचित बहुजन आघाडीतप्रवेश केला आहे. अकोला येथेवंचित बहुजन आघाडीचेनेते प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत उत्कर्षा रुपवते यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष विशाल कोळगे हे उपस्थित होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.-उत्कर्षा रुपवतेशिर्डीलोकसभा मतदारसंघातून काँग्रेसकडून इच्छुक होत्या.

मात्र, महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा शिवसेनेकडे (ठाकरे गट) गेली. त्यामुळे काँग्रेसकडून वारंवार लोकसभेची उमेदवारी नाकारली जात असल्याने उत्कर्षा रुपवते नाराज होत्या. अखेर उत्कर्षा रूपवते यांनी काँग्रेसची साथ सोडली आहे. आता उत्कर्षा रूपवते वंचितकडून शिर्डी लोकसभेची उमेदवारी करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे शिर्डी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून भाऊसाहेब



वाकचौरे, महायुतीकडून सदाशिव लोखंडे आणि वंचितने उत्कर्षा रुपवते यांना उमेदवारी जाहीर केल्यास तिरंगी लढत होऊ शकते. उत्कर्षा रूपवते या गेल्या अनेक दिवसांपासून पक्षश्रेष्ठींकडे ही जागा काँग्रेसला द्यावी अशी मागणी करत होत्या.

मात्र, या जागेसाठी ठाकरे गटाकडून भाऊसाहेब वाकचौरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्या आक्रमक झाल्या होत्या. त्यांनी पक्षश्रेष्ठींनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली होती. तसेच, शिर्डी लोकसभा निवडणुकीसाठी उत्कर्षा रुपवते या वंचितच्या संपर्कात असल्याची माहिती यापूर्वी समोर आली होती. उत्कर्षा रुपवते यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत प्रकाश आंबेडकर यांची भेट सुद्धा घेतली होती. दरम्यान, शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी वंचितकडे पुण्यातील उद्योजक विनोद अहिरे यांनीही उमेदवारीची मागणी केली होती. विनोद अहिरे मुळचे अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावचे आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी अकोल्यात प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली होती. यामुळे आता शिर्डी लोकसभा मतदारसंघात वंचितकडून कुणाला उमेदवारी मिळणार, याकडे सर्वांच लक्ष लागले आहे.



# पुण्यातील चित्रप्रदर्शनात पांडुरंग पोळ यांच्या तैलचित्राचे कौतुक

**शिरोळ** : शिरोळच्या श्री. पद्माराजे विद्यालयाचे माजी कला शिक्षक व महात्मा गांधी विद्यालय सावळज( ता तासगाव ज़ि सांगली)चे विद्यमान कला शिक्षक पांडुरंग आनंदराव पोळ यांनी तयार केलेली द क्लाऊड्स या विषयावरील तैलचित्रे पुणे येथील बालगंधर्व कला दालनात प्रदर्शित करण्यात आले या तैलचित्राचे

उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. बालगंधर्व कला दालन पुणे येथे १५ एप्रिल ते १८ एप्रिल २०२४ अखेर १० चित्रकारांचे जागतिक कला दिनाचे औचित्य साधून इम्प्रेशन ऑफ माईंड या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख व प्रसिद्ध चित्रकार भास्कर हांडे यांचे हस्ते झाले.

या प्रदर्शनास रयत शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉ. ज्ञानदेव म्हस्के, माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसचिव बंडू पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य विनायक संकपाळ,संस्थेच्या पश्चिम विभाग, पुणेचे विभागीय अधिकारी.किसन रत्नपारखी, सहाय्यक विभागीय अधिकारी एस.टी.पवार,उत्तर विभाग,अहमदनगरचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे,दक्षिण विभाग, सांगलीचे सहाय्यक विभागीय अधिकारी अँथोनी डिसोझा, चित्रकार संजय कुंभार हे मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनात पांडुरंग पोळ,किरण कुंभार, प्रदीप कुंभार प्रसाद पेंडूरकर प्रसाद वालेकर, राजेंद्र घोडके, रमेश खडबडे, रवींद्र माळवदे, सुनील देसाई व विनोद विरणक या चित्रकारांची विविध शैलीतील चित्रे सदर प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आली आहेत. चित्रकारांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, बदलते कला व तंत्र, कला शिक्षण याबाबत भास्कर हांडे यांनी मौलिक मार्गदर्शन केले.विकास देशमुख यांनी चित्रकारांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व परिचय किरण कुंभार यांनी केले व आभार रमेश खडबडे यांनी मानले.

# एकत्र आलो म्हणून तसलं काय नाय, तुम्ही चांगले मताधिक्य द्या

## की समोरच्याचं तिकीटच कापलं पाहिजे

**मंगळवेढा** : माझी उमेदवारी शरद पवारांनी निश्चित केली, आज आम्ही एकत्र आलो म्हणून तसलं काय नाय, तुम्ही चांगले मताधिक्य द्या, की समोरच्याचं तिकीटच कापलं पाहिजे असे आवाहन विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्याच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, प्रांतिक सदस्य राहुल शहा, विठ्ठलचे अध्यक्ष अभिजित पाटील, विधानसभा कार्याध्यक्ष मुजम्मिल काझी, शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी, तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, आण्णा शिरसट, माणिक गुंगे, संगीता कट्टे, विजय खवतोडे, सुरेश कट्टे, संदीप बुरकुल, जमीर इनामदार,



ज्ञानेश्वर भंडगे, महादेव शिंदे, दामाजी माने, काशीनाथ सावंजी, विशाल खटकाळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की, सध्याच्या निवडणुकीत नेमके विषय काय त्याचे नियोजन करून बुथ मजबूत करण्याची गरज आहे. जिल्ह्यात सत्ता केंद्राच्या माध्यमातून आपल्या गरजा भागविणारे मोहिते-पाटील परत राष्ट्रवादीत आले. राम मंदीर पुर्ण केल्याचा दावा करत असले तरी राम एक वचनी होता पण यांनी जाहीर केलेले १५ लाख दिले नाही, दरवर्षी २ लाख नोकऱ्यांचे वचन पाळले नाही.

सध्या सोलापूरात आठ दिवसांत पाणी नाही, १० वर्षात काय केले याचे उत्तर शोधण्याची वेळ आली. निवडक उद्योजकाचे १६ लाख कोटी माफ केले.२०१४ व २०१९ सोशल मीडियातून मोदीच्या जाहीरातीच मात्र आता सोशल मीडिया लोक विरोध करून लागले. उपमुख्यमंत्री फडणवीस काल मंगळवेढा उपसा जलसिंचनवर चकार शब्द बोलले का? विद्यमान भाजप खासदाराने पाच वर्षात ३९ लाख खासदार निधी खर्च केला.

उलट त्यांच्या उमेदवाराला मताधिक्य देण्याची तंबी देत विधानसभेची उमेदवारी कापण्याचा इशारा दिला. त्यांचे तिकीट कसं कापता येईल,यासाठी प्रयत्न करावेत.तर आपल्याला रान मोकळे होईल. जिल्हाध्यक्ष बळीराम साठे म्हणाले की,दहा वर्षात देशातील वातावरण खुनशी प्रवृत्तीचे झाले. पंतप्रधान मोदीनी वाटेल ते नियम वाटेल ते कायदे लावले, ईडी लावून भितीचे वातावरण निर्माण केले, औरंगजेब काळात जिझीया कर होता.

तशी जी एसटी लावून चुकीच्या पध्दतीने कारभार सुरू केला. या निवडणुकीत उठाव न केल्यास भविष्यात या देशात हुकूमशाही आल्याशिवाय राहणार नाही. एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहोत,भाजपाला बहुमतापासून दूर ठेवले तर, लोकशाही टिकेल. राहूल शहा म्हणाले की, मोदी सरकारच्या कारभारावरील राग मतपेटीतून व्यक्त होणार आहे.

आघाडी उमेदवार सक्षम असून यंदाच्या निवडणुकीत बदल घडवायाचा आहे. महेश माने म्हणाले पुण्यात अभाविपच्या माध्यमातून तरूणाच्या माथी भडकावण्ग्रानी सोलापूरात येवून शिकवू नये. त्यांचे पार्सल बीडला नाही गुजरातला पाठवा, सुत्रसंचालन राजेंद्रकुमार जाधव यांनी केले.

## राजू शेट्टींचे एक पाऊल मागे!

# बुलढाण्यात रविकांत तुपकर यांना पाठिंबा

**बुलढाणा** : मागील काही काळापासून असलेले मतभेद, दुरावा विसरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने बुलढाणा मतदारसंघातील अपक्ष तथा संघटनेचे जुनेजाणते कार्यकर्ते रविकांत तुपकर यांना पाठिंबा दिला आहे. राजू शेट्टी यांनी एक पाऊल मागे घेत तुपकरांसोबत आपले मागील काळात मतभेद होते, मनभेद नाही, हे सूचित केले आहे.

'स्वाभिमानी' चे सर्वेसर्वा राजू शेट्टी यांच्यावतीने संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांनी यासंदर्भात निवेदन प्रसिद्धी केले आहे. त्यानुसार, स्वाभिमानी संघटनेशी संलग्न स्वाभिमानी पक्षाच्यावतीने हातकणंगले, बुलढाणा, सांगली, परभणी मतदारसंघात 'आपले उमेदवार' लढत आहेत. पक्ष कोणत्याही आघाडीत नसून स्वबळावर लढत आहे. यामुळे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या उमेदवारांचा प्रचार करावा, असे आवाहन जगताप यांनी केले आहे.

**'स्वबळावर' समर्थन देऊ नये**

**या पाठिंब्याबरोबरच इतर मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांना राजू शेट्टी यांनी तंबी देखील दिली आहे. इतर मतदारसंघात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठांना न विचारता कोणत्याही राजकीय पक्षाला जाहीर पाठिंबा देऊ नये, असे आदेश राजू शेट्टी यांनी दिले आहे. तसे केल्यास त्यांच्याविरुद्ध संघटनेकडून कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**

# काँग्रेसच्या नाराज महिला नेत्याचा राजीनामा; वंचितकडून लढण्याची शक्यता

एकीकडे काही मतदारसंघ ठाकरे गटाला सोडल्यानेकाँग्रेसनेत्यांमध्ये नाराजी आहे. सांगलीत विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे, तर मुंबईत वर्षा गायकवाड यांनी पक्षाच्या बैठकांनाच दांडी मारण्यास सुरुवात केली आहे. अशातच आणखी एका मतदारसंघातकाँग्रेसमुळेठाकरेंची शिवसेना अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे

शिर्डी मतदारसंघातील उत्कर्षा रुपवते यांनी आज सायंकाळी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा आणि पदांचा राजीनामा दिला आहे.शिर्डीचीजागा ठाकरेंना सोडल्याने त्या नाराज होत्या. अशातच रुपवते यांनी आज राजीनामा देत अकोल्याची वाट




धरली आहे. त्या अकोल्यात पोहोचल्या असून काही वेळातच प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीतवंचित बहुजन आघाडीतप्रवेश करण्याची शक्यता आहे. रुपवते यांना वंचितकडून शिर्डीची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. असे झाल्यास शिर्डीमध्ये शिंदे गटाचे खासदार सदाशिव लोखंडे आणि ठाकरे गटाचे भाऊसाहेब वाकचौरे यांच्यातील दुरंगी लढत तिरंगी होणार आहे. रुपवते लढण्याचा फटका ठाकरे गटाला बसण्याची शक्यता आहे.सुरुवातीपासून काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला मतदारसंघ २००९ मध्ये शिवसेनेने हिसकावून घेतला होता. परंतु २०१४ मध्ये वाकचौरे यांनी काँग्रेसमध्ये जात शिवसेनेला धक्का दिला होता. २०१४ च्या निवडणुकीत शिवसेनेने वाकचौरेंच्या विरोधात लोखंडे यांना उतरविले होते. लोखंडे यांनी वाकचौरेंचा पराभव केला होता. यानंतर २०१९ मध्येही लोखंडे विजयी झाले होते. आता २०२४ मध्ये लोखंडे शिंदेंच्या शिवसेनेत असून वाकचौरे पुन्हा उमेदवारीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेत आले आहेत.






**साताऱ्यात रामनवमी उत्साहात साजरी...** शहरातील विविध ठिकाणी असलेल्या श्रीरामाच्या मंदिरात बुधवारी रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शेकडो भक्तांनी सोहळ्यास उपस्थिती लावली होती. (छाया : कैवल्य फोटोज्, सातारा)

# पाचगणीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**राजदंड / पाचगणी**

पाचगणी शहर आणि परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठय़ा उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी शहराच्या विविध भागांत सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी शिस्तबद्ध वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये ढोलाचा छबिना शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा उदंड उत्साह पाहायला मिळाला. यानिमित्ताने अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पाचगणीत दरवर्षी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या वतीने सर्वांना सामावून घेवून हा कार्यक्रम साजरा केला जातो. यावर्षी विविध मंडळे , ग्रामस्थ यांचे चित्ररथ, विविध देखावे यांचेसह सायंकाळी बेबी पॉइंट येथून रॅलीला सुरुवात झाली. यामध्ये सहभागी झालेले चित्ररथ सर्वांचे आकर्षण ठरले होते. तर छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅली आल्यावर डी जे.च्या तालावर तरुणाई थिरकली होती. फटाक्यांची आतषबाजी आणि जय भिमच्या गर्जनानी चौक निनादून गेला होता. रॅलीच्या प्रारंभी असणारा डॉ आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा चित्ररथ सर्वांचे आकर्षण ठरला.

दरम्यान, जयंतीदिनी सकाळपासून डॉ बाबासाहेब आंबेडकर गार्डन येथील पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासून गर्दी केली होती.

सध्या लोकसभा निवडणूक असल्याने अनेक ठिकाणी नेत्यांनी हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले. सायंकाळी रॅलीदरम्यान आमदार मकरंद पाटील यांनी भेट देवून नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यकर्ते व आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाखों भाविकांच्या उपस्थितीत नयनरम्य ध्वज सोहळा

## शिव-पार्वती विवाह सोहळाही संपन्न; शिंगणापुरात 'हरहर महादेव' चा गजर

**राजदंड / दहिवडी**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिखर शिंगणापूर यात्रेत मंगळवारी लाखो भाविकांच्या उपस्थितीत शंभू महादेव मंदिर ते अमृतेश्वर मंदिराच्या कळसास मानाचे पागोटे बांधण्याचा सोहळा उत्साही वातावरणात पार पडला. तर रात्री बारा वाजता पारंपरिक पद्धतीने मंगलमय वातावरणात शिवपार्वती विवाहसोहळा उत्साहात पार पडला.

शिंगणापूर यात्रेत प्रतिवर्षी चैत्र शुद्ध अष्टमीच्या दिवशी मानाचे पागोटे (ध्वज) बांधण्याचा नयनरम्य सोहळा होत असतो. मंगळवारी दुपारी सर्व मानाच्या पागोट्यांचे शिंगणापूर नगरीत आगमन झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच सारिका शेंडे यांनी स्वागत केले. त्यानंतर सर्व पागोटी वाजतगाजत शंभू महादेव मंदिरापर्यंत आणण्यात आली. मंदिरात आल्यानंतर संभाजी धजकरी (आवसगाव जि बीड), विलास धजकरी (खामसवाडी जि. उस्मानाबाद), अशोक साळी (कोळगाव जि. अहमदनगर) तसेच महाराष्ट्र राज्य कोळी महासंघ या सर्व पागोट्यांचे देवस्थानचे व्यवस्थापक मंदार पत्की यांच्यासह सर्व सेवाधारी यांनी विधिवत पद्धतीने पूजन केले. लाखो भाविकांच्या उपस्थितीत हरहर महादेव जयघोषात शंभू महादेव मंदिरापासून अमृतेश्वर मंदिराच्या कळसास मानाचे पागोटे-ध्वज बांधण्याचा सोहळा पार पडला.

ध्वज बांधण्याचा मान असलेल्या कोळी समाज बांधवांनी मोठ्या साहसाने जवळपास दीड तास परिश्रम घेत चार टप्प्यावरून मानांची सर्व पागोटी शंभू महादेव मंदिर ते अमृतेश्वर मंदिराच्या कळसाला बांधली. जवळपास दीड तास चाललेल्या ध्वज बांधण्याच्या नयनरम्य सोहळ्याच्या वेळी उपस्थित लाखो भाविकांनी टाळ्यांच्या गजरात, हरहर महादेव जयघोष करत आनंदोत्सव साजरा केला. त्यानंतर रात्री बारा वाजता शंभू महादेव मंदिराच्या पाठीमागे असलेल्या बोहोल्यावर विष्णूलक्ष्मीच्या साक्षीने शिवपार्वती विवाहसोहळा पार पडला.

या सोहळ्यास वधू-वरांकडील बडवे, जिरायतखाने यांच्यासह महाराज सरकार, चारचौथाई, बडवे, जंगम आदी उपस्थित होते.



# म्हसवड शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**राजदंड / म्हसवड**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती म्हसवड शहरात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त येथील डॉ. आंबेडकर भवन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, यानिमित्त माण तालुक्यातील सर्व राजकिय, सामाजिक, वैचारीक, कला, क्रिडा क्षेत्रातील विविध मान्यवरांनी याठिकाणी उपस्थित राहुन डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले. यादिवशी सकाळी प्रथम पंचशील ध्वजाचे पुजन संयोजकांच्या हस्ते करण्यात आले, त्यानंतर विहारातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तथागत बुद्ध, शाहू महाराज, म. फुले, छ. शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, माता रमाबाई, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमानां उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून बुद्ध, धम्म, संघ वंदना कुमार सरतापे यांनी घेतली त्यानंतर उपस्थितांनी महामानवाने अभिवादन केले.



दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अनेक मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आ. जयकुमार गोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रभाकर देशमुख, राष्ट्रवादी युवकचे सरचिटणीस अभयसिंह जगताप, माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा, नितीन दोशी, आ. गोरे यांच्या पत्नी सोनियाताई गोरे, माजी उपनगराध्यक्षा स्नेहलताई सुर्यवंशी, युवराज सुर्यवंशी, जगन्नाथ लोखंडे, शहाजी लोखंडे, सावंतसर,करण सिन्हा मित्र परिवार, पृथ्वीराज राजेमाने, तेजसिह राजेमाने, बाळासाहेब पिसे, राजेंद्र पिसे, लहुराज चव्हाण, लुनेश विरकर, सचिन लोखंडे, विश्वजित देशमुख, किशोर सोनवणे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब सावंत, आकाश माने, जिल्हाध्यक्ष वंचित युवा आघाडीचे सनी तुपे, संजय माने, फारुख काझी आदींनी येथील डॉ. आंबेडकर भवनात हजेरी लावली, तर सायंकाळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत पर्यंती, देवापुर, पुळकोटी, शिरताव, वरकुटे - मलवडी, धुळदेव, हिंगणी, कारखेल, खुटबाव,रांजणी, पळशी, जाशी, वडजल, दिवड, कुकूडवाड भागातील हजारो धम्म बांधव, महिला, तरुण व तरुणी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जयंती निमित्ताने भारतीय संविधान व कलमे याची सखोल माहिती युवा व्याख्याते रोहीत लोहार, डॉ. तायडे, श्रेया बनसोडे, यश धाईजे, तनिष्का सरतापे, शरण्या सरतापे यांनी डॉ. बाबासाहेब व त्यांचे तरुणां विषय मत, त्याच प्रमाणे तथागत बुद्ध व त्यांचा धम्म या विषयावर भाषणे झाली.

दुपारी बारा नंतर अन्नदानाचा कार्यक्रम घेण्यात आला सायंकाळी पाच नंतर भव्य मिरवणुक काढण्यात आली यावेळी हजारो भिम अनुयायी पांढरी वस्त्रे परिधान करून निळे फेटे, निळे उपरणे गळ्यात घालून सहभागी झाले होते यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर,गौतम बुद्ध, छ शिवाजी महाराज महात्मा फुले, आण्णाभाऊ साठे राजे उमाजी नाईक संत बश्वेश्वर, शाहू महाराज यांच्या जयघोषात मिरवणूक काढण्यात आलीत महिलांचे लेझीम व भिम गितावरील नृत्य, हलगी, घुमक्याच्या निनादने परिसर दणाणून सोडला होता तर महिलांचे लेझीम पहाण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. तब्बल साडेतीन तास सुरू असलेली हि मिरवणूक रात्री दहा वाजता हजारो भिम सैनिकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली.

या मिरवणुकीच्या निमित्ताने म्हसवड पोलिस स्टेशनच्या वतीने मिरवणुकीचे नियोजन व्यवस्थीत केल्याने सातारा पंढरपूर रोडवर वाहतूकीचे नियोजन केल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली नाही.

# तरुणांनी सामाजिक बांधिलकी जोपासणे काळाची गरज

## आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे प्रतिपादन

**राजदंड / सातारा**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माणुसकी हरवत चालली आहे की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो याचे भान ठेवून प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार समाजासाठी आपले योगदान दिले पाहिजे. खास करून युवकांनी समाजासाठी तळमळीने काम करून सामाजिक बांधिलकी जोपासावी, ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या वाढदिनी ३० मार्चला गेली सलग ७ वर्ष रक्तदान करणारे आकाशवाणी झोपडपट्टी येथील कार्यकर्ते सचिन कांबळे यांच्या सत्कारप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रवी पवार, जतीन वाघमारे आदी उपस्थित होते.



सचिन कांबळे हे आ. शिवेंद्रसिंहराजे यांचे कट्टर समर्थक असून आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मार्गदर्शनाखाली ते आकाशवाणी झोपडपट्टी येथे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कार्यरत असतात. विविध सामाजिक उपक्रम राबवतानाच आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या वाढदिनी ते न चुकता रक्तदान करता. या बद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी कांबळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दहावीनंतरच्या 'करिअर'च्या वाटा...

## 'दिशा ॲकॅडमी'तर्फे सातारा शहरात रविवारी मोफत सेमिनार

**राजदंड / वाई**

माहितीची अभाव आणि आर्थिक कोंडी, या चक्रव्युहात पालक-विद्यार्थी होरपळून निघतात. बहुतांश वेळा १० वीची परीक्षा दिलेले विद्यार्थी व त्यांचे पालक यांची संख्या मोठी असल्याचे दिसून येते. ही गैरसोय टाळण्यासाठीच शिक्षण क्षेत्रात नावाजलेली दिशा ॲकॅडमी आता सातारा शहरात देखील आपल्या शैक्षणिक सेवा देण्यासाठी सज्ज झाली आहे.

१० वी नंतर करिअरच्या विविध संधी जाणून घेण्यासाठी पालकांची तारांबळ उडत असताना दिशा ॲकॅडमीचे साताऱ्यातील दमदार आगमन पालक व विद्यार्थ्यांना सुखावणार आहे. यानिमित्त दिशा ॲकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन कदम याचा मोफत सेमिनार हॉटेल राधिका पॅलेस इथे आयोजित केला आहे.

दिशाच्या सातारा शाखेची माहिती देतांना प्रा. नितीन कदम म्हणाले; आर्थिक अडचणीमुळे शिक्षणाच्या वाटा खुंटू नये, दिशा ॲकॅडमीचा हा व्यापक दृष्टीकोन नेहमीच पालक आणि विद्यार्थ्यांना दिलास देत आला आहे. शिक्षणाचा उच्च दर्जा राखत आम्ही सर्वोत्तम सेवा देण्यासाठी तत्पर आहोत. विद्यार्थ्यांना होणार फायदा आणि दिशाची भुमिका समजून घेण्यासाठी विद्यार्थी व त्यांचे पालक यांनी मोफत सेमिनारला जरूर यायलाच हवे.

२१ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत होणाऱ्या या मोफत सेमिनार मध्ये १० वी नंतर करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षा, परीक्षा उतीर्ण होण्याचे तंत्र; अशा महत्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

१० वीची परीक्षा दिलेले विद्यार्थी व त्यांचे पालक यांनी या मोफत सेमिनारचा जरूर लाभ घ्यावा असे आवाहन दिशा ॲकॅडमीच्यावतीने करण्यात आले आहे.

# बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया सातारा सेंटरचा पदग्रहण सोहळा संपन्न

## सातारा सेंटर चेअरमनपदी सुधीर ठोके, सेक्रेटरीपदी हर्षद वालावलकर यांचे पदग्रहण

**राजदंड / सातारा**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा सेंटर च्या २०२४-२५ साठी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा अतिशय भव्य आणि दिमाखदार पदग्रहण सोहळा हॉटेल विठ्ठल मंगलम येथे पार पडला.

सातारा सेंटरचे नूतन चेअरमन श्री. सुधीर ठोके, सेक्रेटरी श्री. हर्षद वालावलकर, व्हाईस चेअरमन श्री. सयाजी भोसले, ट्रेझरर श्री. पृथ्वीराज पाटील यांनी आपल्या पदाची सूत्रे मावळते चेअरमन श्री. अनिल दातीर आणि त्यांच्या टीमच्या हस्ते स्वीकारली. नवनिर्वाचित टीम मध्ये जनरल कौन्सिल मेम्बर म्हणून श्री. अनिल दातीर, श्री. सचिन देशमुख व श्री. सुधीर घार्गे आणि एक्झिक्युटीव्ह कमिटीत निलेश पाटील, मंगेश लावंड, सुहास बगाडे, हेमंत कदम, मिलींद वाईकर, विवेक ठोके, शरद जाधव, शंभुराज पाटील, संदीप जाधव, विश्वास नारकर, अजय खटावकर, रणजित ढगे,




मंदार खळदकर, शैलेंद्र जगताप, अनिल फडतरे, सचिन राजगे, अधिक जाधव यांची निवड झाली आहे. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे वेस्ट झोनचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. आनंद गुप्ता, बीएआयचे स्टेट चेअरमन श्री. अनिल सोनावणे, बीएआय माजी स्टेट चेअरमन श्री. सचिन देशमुख, कालिका स्टील चे संचालक श्री. अतुल परमार यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला बीएआय च्या मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, सोलापूर, मालेगाव, फलटण, बारामती, इचलकंजी, कोल्हापूर व इतर अनेक सेंटरचे चेअरमन आणि पदाधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर बीएआय चे सभासद आणि त्यांचे कुटुंबीय, स्नेही मोठ्या संख्येने हजर होते. खासदार श्रीमंत छत्रपती श्री. उदयनराजे भोसले, आमदार श्रीमंत छत्रपती श्री. शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रत्यक्ष येऊन नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर शहरातल्या अनेक संस्थांचे पदाधिकारी आणि साताऱ्यातील अनेक प्रतिष्ठित नागरिक या सोहळ्यास उपस्थित होते.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे वेस्ट झोनचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. आनंद गुप्ता यांनी सातारा सेंटरच्या कार्याचे कौतुक केले. स्टेट चेअरमन श्री. अनिल सोनावणे यांनीही सातारा सेंटरने आजपर्यत केलेल्या कार्याचा गौरव केला यावेळी नूतन चेअरमन श्री. सुधीर ठोके यांनी यांनीही भविष्यातील करावयाच्या कामांबद्दल माहिती दिली. यामध्ये सामाजिक उपक्रमांबरोबरच, बांधकाम व्यावसायिकांना त्रासदायक ठरणार्या रेरा, जीएसटी यासारख्या विषयांवर सेमीनारचे आयोजन, स्कील लेबरसाठी टेनिंग सेंटर उभारणे, इमारत मंजुरी व गर्व्हमेंट कॉन्ट्रॅक्टरयांच्या अनेक समस्या सोडवणे, सातारा जिल्ह्यातील सरकारी ठेकेदारांना बिल्डर्स असोसिएशनचे सभासद करून संघटनेची ताकद वाढवणे हे उद्दीष्ठ असल्याचे मनोगतात सांगितले.

# राष्ट्रवादी कार्यालयात महिला मेळाव्याला प्रतिसाद

**राजदंड / सातारा**

सातारा जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस - शरदचंद्र पवार पक्ष कार्यालयात महिला भगिनींचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित राहून महिला भगिनींशी संवाद साधत त्यांना संबोधित केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने व शरद पवार यांनी महिलांना समान संधी देण्याचा, वडिलांच्या मालमत्तेमध्ये वाटा देण्याचा व घरावरती समान हक्क देण्याचा असे अनेक निर्णय घेतले आहेत. महिला आरक्षणाची सुरुवात आदरणीय शरद पवार साहेब यांनीच केली होती.




७३ वी घटना दुरुस्ती करून त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण आणलं. महाराष्ट्रात मंडल आयोग लागू केला. संरक्षण मंत्री असताना पवार साहेबांनी आर्मीमध्ये महिलांना ११ टक्के आरक्षण दिलं. महिला धोरण आणणारं महाराष्ट्र देशातील पहिला राज्य ठरलं.

इंडिया आघाडीच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या नवीन नोकऱ्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण, गरीब कुटुंबातील महिलेला दरवर्षी १ लाख रुपये अशा अनेक गोष्टी जाहीर करण्यात आल्या आहेत. जाहीर केलेल्या घोषणा अंमलात आणण्यासाठी महाविकास आघाडी पूर्णपणे प्रयत्नशील असेल, असे आश्वासन यावेळी दिले.

# दुबईत पावसाने हाहाकार!

# गुडघाभर पाण्यातून विमानांचे टेक ऑफ

**दुबई :** संयुक्त अरब अमिराती म्हणजेच युएईमधील सर्वात स्मार्ट शहर असलेल्या दुबईची जगभराम ध्ये तेथील श्रीमंतीसाठी चर्चा असते. जगभरातील अब्जाधिशांनी केलेली गुंतवणूक आणि येथील आलिशान घरांबरोबरच पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या या शहरावर सध्या एक मोठे नैसर्गिक संकट ओढावले आहे. युएईमध्ये मागील २ दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. येथे पावसाने हाहाकार माजवला आहे. या शहरातील भव्यता, चकाचक इमारती, मोठे रस्ते सारे काही जलयम झाले आहे. येथील मॉलपासून विमानतळांपर्यंत सर्वच ठिकाणी मोठ्याप्रमाणात पाणी भारले आहे.

**विमानतळावर घोषणा**

दुबई विमानतळाच्या रन-वेवर जवळपास गुडघाभर पाणी साचले असून या पाण्यामधूनच काही उड्डाणं करण्यात आली. मात्र पाण्याची पातळी अधिक वाढल्याने जगातील सर्वात व्यस्त विमानतळांपैकी एक असलेले दुबई विमानतळ उड्डाणांसाठी बंद करण्यात आले आहे. दुबई विमानतळाबरोबरच दुबईतील धक्कादायक परिस्थिती दाखवणारे अनेक व्हिडीओ समोर आले आहे. विमानतळांवरील परिस्थिती सामान्य होईपर्यंत आणि पाण्याचा निचरा होईपर्यंत उड्डाणे डायव्हर्ट करण्यात आल्याच्या घोषणा विमानतळावर केल्या जात आहे.

**शेजारच्या देशात १८ जणांचा मृत्यू**

दुबईमधील घरांमध्ये, मेट्रो स्थानकांमध्ये आणि रस्त्यांवर पाणी भारलं आहे. दुबईमध्ये भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या मुकेश अंबानी, शाहरुख खान यांच्याबरोबर अनेक अब्जाधिशांच्या मालकीचे बंगले आणि फ्लॅट्स आहेत. युएईच्या शेजारचा देश असलेल्या ओमानमध्येही पावसामुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झालं आहे. ओमानमध्ये अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्यांची संख्या १८ वर पोहोचली आहे. या देशामध्ये अनेकजण बेपत्ता झाले आहेत.

**समुद्रकिनारी न जण्याचा सल्ला**

दुबई अंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिकृत एक्स म्हणजेच ट्वीटर हॅण्डलवरुन, विमानतळावरील सर्व वाहतूक सध्या वळवण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. या मार्गाने जाणाऱ्या तुमच्या विमानांचं बदलेलं वेळापत्रक वेळोवेळी पाहत रहावे आणि विमान कंपन्यांच्या संपर्कात राहा असा सल्ला प्रवाशांना देण्यात आला आहे. तसेच विमातनळावर पोहचण्याआधी येथील परिस्थितीचा आढावा घेऊनच घराबाहेर पडा असा सल्ला देण्यात आला आहे. दुबई पोलिसांनीही वादळासंदर्भातील इशारा जारी केला आहे. पोलिसांनी समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. ''पाऊस, वेगवान हवा आणि विजांचा कडकडाट होत असून पूरपरिस्थिती निर्माण होऊ शकते,'' असं म्हटलं आहे.

**गाड्यांच्या रांगा**

दुबईमधील रस्त्यांवर मोठ्याप्रमाणात पाणी साचलं आहे. लोकांना घराबाहेर पडणंही कठीण झाले आहे. सोशल मीडियावर समोर आलेल्या व्हिडीओमध्ये अनेक ठिकाणी गुडघाभर पाणी भरले असून त्यामध्ये कार तरंगताना दिसत आहेत. एका व्हिडीओत तर रॉल्स रॉयल गाडी पाण्यात अडकल्याचे दिसत आहे.

पुढील काही दिवस दुबईमध्ये मध्यम ते सौम्य स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# रामलल्लाचा 'सूर्यतिलक', ४ मिनिटे डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा



**अयोध्या :** अयोध्येत राम मंदिरात रामनवमीनिमित्त सूर्यतिलक सोहळा पार पडला. रामललाच्या मूर्तीवर सूर्यतिलक सोहळा पाहण्यासाठी देशभरातून भाविक उपस्थित होते. दुपारी १२ ते १२ वाजून ४ मिनिटांपर्यंत हा सूर्यतिलक सोहळा झाला. यावेळी अनेक महंत उपस्थित होते.

प्रभू श्रीरामांच्या मूर्तीवर सूर्यतिलक सोहळा डोळ्यांचे पारणं फेडणारा होता.

रामललाची मूर्ती प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर पहिलाच रामनवमी सोहळा पार पडत आहे. या सोहळ्यानिमित्त भाविकांची राममंदिरात प्रचंड गर्दी आहे. रामनवमी उत्सव साजरा केला जात आहे. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा सोहळा पाहण्यासाठी देशभरातून भाविक अयोध्येत दाखल झाले होते.

कसा झाला सूर्यतिलक सोहळा?

राम मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या आरशात सूर्यप्रकाश पडतो. तिथून प्रकाश परावर्तित होऊन पितळी पाईपमधून थेट प्रभू रामललाच्या कपाळावर पोहोचतो. सूर्यकिरण ९० अंश कोनातून परावर्तित होतो. तीन वेगवेगळ्या लेन्समधून सूर्यकिरणं लंबवर्तुळाकार पाईपमधून परावर्तित होता. त्यानंतर आरशावर तो सूर्यप्रकाश पडतो आणि तिथून गाभाऱ्यात मूर्तीवर ७५ मिलीमीटरचा सूर्यतिलक पडतो. दुपारी १२ वाजता सूर्यतिलक सोहळा सुरू झाला. चार मिनिटे हा सोहळा होता

# इस्रायलवर केलेला हल्ला इराणला भोवणार, अमेरिकेने उचलले 'हे' मोठे पाऊल

दिल्ली,१७ एप्रिल (पीएसआय)

इस्रायल आणि पॅलेस्टीन युद्धातला संघर्ष शमलेला नाही. अशात इराणने इस्रायलवर हल्ला केला. पहिल्याच हल्ल्यात शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोन लॉंच करण्यात आले. शनिवारी रात्री म्हणजेच १३ एप्रिलच्या रात्री झालेल्या या हल्ल्यानंतर तेल अवीव आणि जेरुसलेमसह संपूर्ण इस्रायलमध्ये हवाई हल्ल्याचे सायरन घुमले. तसंच स्फोटांचेही आवाज आले. मात्र हाच हल्ला करणे इराणला भोवणार आहे. कारण अमेरिकेने एक मोठे पाऊल यानंतर उचलले आहे.

**अमेरिकेने काय म्हटले आहे?**

अमेरिकेने मंगळवारी इस्रायलवर झालेल्या हल्ल्यांबाबत भाष्य केलं आहे. इराणच्या मिसाइल आणि ड्रोन प्रोग्रामवर आम्ही कठोर निर्बंध लादणार आहोत. याबाबत आम्हाला आमच्या सहाकाऱ्यांकडूनही सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे असं म्हणत अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलविन यांनी इराणच्या मिसाईल आणि ड्रोन प्रोग्रामवर निर्बंध लादण्याची घोषणा केली आहे.

इराणने शनिवारी इस्रायलवर ३०० क्षेपणास्त्रं डागली होती.



तसंच ड्रोन हल्लेही केले होते. यानंतर अमेरिकेने आता इराणच्या विरोधात मोठं पाऊल उचललं आहे. त्यामुळे इस्रायलवर हल्ला करण्याचा निर्णय घेणं इराणला भोवण्याची चिन्हं आहेत. सुलिवन म्हणाले, ''येत्या काही दिवसांमध्ये अमेरिका इराणवर निर्बंध लादणार आहे. त्यांच्या मिसाइल आणि ड्रोन डागण्याच्या संख्येवर हे निर्बंध असतील. तसंच नवी मार्गदर्शक तत्त्वेही त्यांना आखून दिली जातील. आमचे सहकारी आम्हाला या निर्णयात साथ देतील अशी अपेक्षा आहे.'' असंही सुलिवन यांनी स्पष्ट केलं.

नेमके काय घडले?

इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प (घेंउण) ने हल्ल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार १ एप्रिल रोजी ''सीरियातील इराणी वाणिज्य दूतावासाला लक्ष्य करण्याच्या झिओनिस्ट घटकांच्या गुन्ह्यासाठी'' शिक्षेचा भाग म्हणून ''ट्रू प्रॉमिस'' ऑपरेशन अंतर्गत ड्रोन आणि क्षेपणास्त्रे सुरू करण्यात आली आहेत. दमास्कसमधील हल्ल्यात घेंउण च्या एलिट कुद्स फोर्समधील दोन वरिष्ठ जनरल्ससह १२ लोक ठार झाले होते. इस्रायलने वाणिज्य दूतावास हल्ल्याची जबाबदारी घेतली नव्हती किंवा नाकारली सुद्धा नव्हती. दरम्यान, अमेरिकेला संघर्षापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. इस्त्रायलचे गाझावरील युद्धाचे सहा महिने झाले आहेत. त्यामुळे आखाती प्रदेशांमध्ये तणाव वाढवला आहे. हा वणवा आता लेबनॉन आणि सीरियासह आघाडीवर पसरला आहे. आता अमेरिकेने या सगळ्या पार्श्वभूमीवर इराणवर प्रतिबंध लादण्यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातील ८७ हून अधिक उमेदवार यशस्वी

**नवी दिल्ली, :** ेंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत देशातील एकूण १०१६ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यातील ८७ हून अधिक उमदेवारांनी घवघवीत यश मिळविले आहे. एकूण निवड झालेल्या उमेदवारांपैकी जवळपास ८.६ टक्के महाराष्ट्रातून आहेत. राज्यातून समीर प्रकाश खोडे प्रथम आले असून देशात त्यांनी ४२ वा क्रमांक पटकाविला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा वर्ष २०२३ च्या नागरी सेवा मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल मंगळवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील तीन उमेदवारांचा समावेश आहे. नेहा राजपूत यांनी ५१वा तर अनिकेत हिरडे यांनी ८१ वा क्रमांक पटकावला आहे.

एक नजर निकालावर

समीर प्रकाश खोडे (४२) नेहा उद्धवसिंग राजपूत (५१) अनिकेत ज्ञानेश्वर हिर्डे (८१) विनय सुनील पाटील (१२२) विवेक विश्वनाथ सोनवणे (१२६) तेजस सुदीप सारडा (१२८) जान्हवी बाळासाहेब शेखर (१४५) आशिष अशोक पाटील (१४७) अर्चित पराग डोंगरे (१५३) तन्मयी सुहास देसाई (१९०) ऋषिकेश विजय ठाकरे (२२४) अभिषेक प्रमोद टाले (२४९) समर्थ अविनाश शिंदे (२५५) मनीषा धारवे (२५७) शामल कल्याणराव भगत (२५८) आशिष विद्याधर उन्हाळे (२६७) शारदा गजानन मद्येश्वर (२८५) निरंजन महेंद्रसिंह जाधवराव (२८७) समिक्षा म्हेत्रे (३०२) हर्षल भगवान घोगरे (३०८) वृषाली संतराम कांबळे (३१०) शुभम भगवान थिटे (३५९) अंकेत केशवराव जाधव (३९५) शुभम शरद बेहेरे (३९७) मंगेश पाराजी खिलारी (४१४) मयूर भारतसिंग गिरासे (४२२) अदिती संजय चौगुले (४३३) अनिकेत लक्ष्मीकांत कुलकर्णी (४३७) क्षितिज गुरभेले (४४१) अभिषेक डांगे (४५२) स्वाती मोहन राठोड (४९२) लोकेश मनोहर पाटील (४९६) सागर संजय भामरे (५२३) मानसी नानाभाऊ साकोरे (५३१) नेहा नंदकुमार पाटील (५३३) युगल कापसे (५३५) हर्षल राजेश महाजन (५३९) अपूर्व अमृत बालपांडे (५४६) शुभम सुरेश पवार (५६०) विक्रम जोशी (५९३) प्रियंका मोहिते (५९५) अविष्कार डेरले (६०४) केतन अशोक इंगोले (६१०) राजश्री शांताराम देशमुख (६२२) संस्कार निलाक्ष गुप्ता (६२९) सुमित तावरे (६५५) सुरेश लीलाधरराव बोरकर (६५८) अभिषेक अभय ओझर्डे (६६९) नम्रता घोरपडे (६७५) जिज्ञासा सहारे (६८१) श्रृति कोकाटे (६८५) अजय डोके(६८७) सूरज प्रभाकर निकम (७०६) श्वेता गाडे (७११) अभिजित पखारे (७२०) कृणाल अहिरराव (७३२) हिमांशु टेंभेंकर (७३८) सुमितकुमार धोत्रे (७५०) गौरी देवरे (७५९) प्रांजली खांडेकर (७६१) प्रितेश बाविस्कर (७६७) प्रशांत डांगळे (७७५) प्रतिक मंत्री (७८६) मयुरी माधवराव महल्ले (७९४) राहुल पाटील (८०४) सिध्दार्थ तागड (८०९) प्रांजली नवले (८१५) सिध्दार्थ बारवळ (८२३) ओमकार साबळे (८४४) प्रशांत सुरेश भोजने (८४९) प्रतिक बनसोडे (८६२) चिन्मय बनसोड (८९३) निखील चव्हाण (९००) विश्वजीत होळकर (९०५) अक्षय लांबे (९०८) निलेश डाके (९१८) किशनकुमार जाधव (९२३) ऐश्वर्या दादाराव उके (९४३) स्नेहल वाघमारे (९४५) शुभम त्रंबकराव डोंगरदिवे (९६३) गौरव हितेश टेंभुर्णीकर (९६६) मयांक खरे (९६८) शिवानी वासेकर (९७१) श्रावण अमरसिंह देशमुख (९७६) श्रुती उत्तम श्रोते (९८१) सुशीलकुमार सुनील शिंदे (९८९) आदित्य अनिल बामणे (१०१५)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी सप्टेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. जानेवारी – एप्रिल २०२४ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण १०१६ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून –३४७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) ११५, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) – ३०३, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) – १६५, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ८६ उमेदवारांचा समावेश आहे. एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये ३७ दिव्यांग उमेदवारांचा (१६ ऑर्थो पेडिकली अपंग, ०६ दृष्टीहीन, ०५ श्रवणदोष आणि १० एकाधिक अपंग) यांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २४० उमेदवारांची आरक्षित सूची (र्रीन थ्रे) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- ३६, इतर मागास वर्ग -६६, अनुसूचित जाती- १०, अनुसूचित जमाती – ०४ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण चार दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) – ७३, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १७ इतर मागास वर्ग (ओबीसी) –४९, अनुसूचित जाती (एससी) – २७, अनुसूचित जमाती (एसटी) १४ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण – ३७ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) – १६, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०४, इतर मागास वर्ग (ओबीसी) – १०, अनुसूचित जाती (एससी) – ०५, अनुसूचित जमाती (एस.टी.) – ०२ जागा रिक्त आहेत.

भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण – २०० जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) – ८०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) २०, इतर मागास प्रवर्गातून – ५५, अनुसूचित जाती प्रवर्गातून – ३२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून – १३ उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे.

# चारशेचा नारा देणाऱ्या भाजपला किती जागा मिळतील?

## राहुल गांधींनी सांगितली धक्कादायक आकडेवारी

**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या उत्साहात एकीकडे भाजपने एनडीए ४०० हून अधिक जागा जिंकेल असा दावा केला आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी जागांच्या संख्येबाबत मोठे भाकीत केले आहे. आज राहुल गांधी यांनी दावा केला की, यावेळी भाजपला केवळ १५० जागा मिळतील.

गाझियाबादमध्ये अखिलेश यादव यांच्यासमवेत प्रसारमाध्यम ांशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले की, संपूर्ण देशात प्रचंड अंडरकरंट आहे. ते म्हणाले क, ''मी जागांचा अंदाज लावत नाही. १५-२० दिवसांपूर्वी मी विचार करत होतो की, भाजप १८० जागा जिंकेल, पण आता मला वाटते की त्यांना १५० जागा मिळतील. आम्हाला प्रत्येक राज्यातून अहवाल मिळत आहेत की आम्ही कामगिरी सुधारत आहोत. उत्तर प्रदेशमध्ये आमची आघाडी खूप मजबूत आहे आणि आम्ही चांगली कामगिरी करू.''

भाजप संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे

राहुल गांधी म्हणाले, 'ही निवडणूक विचारधारेची निवडणूक आहे. एकीकडे आरएसएस आणि भाजप संविधान आणि लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि दुसरीकडे इंडिया आघाडी आणि काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. निवडणुकीत २-३ मोठे मुद्दे असतात. बेरोजगारी आणि महागाई ही सर्वात मोठी समस्या आहे, पण भाजप लक्ष वळवण्यात व्यग्र आहे, या प्रश्नांवर ना पंतप्रधान बोलतात ना भाजप बोलते.

**तरुणांच्या खात्यात दरवर्षी एक लाख रुपये जमा करणार**

काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, 'गेल्या १० वर्षात पंतप्रधान मोदींनी नोटाबंदी, चुकीचा जीएसटी लागू करून आणि अदानींसारख्या मोठ्या अब्जाधीशांना पाठिंबा देऊन रोजगार निर्मितीची व्यवस्था कमी केली आहे. पहिले काम म्हणजे पुन्हा एकदा रोजगार बळकट करणे, यासाठी आम्ही आमच्या जाहीरनाम्यात २३ कल्पना दिल्या आहेत,

एक कल्पना क्रांतिकारी आहे शिकाऊ उमेदवारीचा अधिकार. आम्ही निर्णय घेतला आहे की आम्ही उत्तर प्रदेशातील सर्व पदवीधर आणि पदविकाधारकांना शिकाऊ प्रशिक्षणाचा अधिकार देऊ. प्रशिक्षण असेल आणि आम्ही तरुणांच्या बँक खात्यात दरवर्षी एक लाख रुपये जमा करू आणि आम्ही हे हक्क करोडो तरुणांना देत आहोत, पेपरफुटीसाठीही कायदा करू.

# एक्स्प्रेस वेवर कारचा भयानक अपघात,

## १० जणांचा मृत्यू, ८ जणांनी जागेवरच सोडला जीव

**अहमदाबाद :** देशभरात लोकसभा निवडणुकीची धामधुम सुरू आहे. अशातच गुजरातमधून अपघाताची मोठी बातमी समोर आली आहे. अहमदाबाद वडोदरा एक्स्प्रेस वे वर कारचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अहमदाबाद वडोदरा एक्स्प्रेस वेवर नडियादजवळ ही घटना घडली आहे. भरधाव कार एका ट्रेलरवर आदळली. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला आहे. ही कार अहमदाबादवरून वडोदराला जात होती. नडियादजवळ आल्यानंतर चालकाचं कारवरील नियंत्रण सुटलं आणि कार थेट ट्रेलरवर जाऊन आदळली. हा अपघातात इतका भीषण होता की, यात ८ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जणांना रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळावर १०८ ची रुग्णवाहिका पोहोचली आहे. बचावकार्य सुरू आहे.

एक्स्प्रेस हायवेवर बचावकार्य करण्यासाठी टीम पोहोचली

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मारूती सुझुकी एर्टिगा कारमधून ही लोक वडोदराला जात होती. कारचा वेग खूप जास्त होता. त्याच वेळी समोर असलेल्या ट्रेलरवर कार पाठीमागून जोरात आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, यात कारचा चुराडा झाला. निमी कार ट्रेलरच्या खाली चालल्या गेल्या होती. त्यामुळे घटनास्थळी जागेवरच ८ जणांचा मृत्यू झाला.

**मृतकांची ओळख पटवण्याचं काम सुरू**

प्राथमिक माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि जिल्हाधिकारी घटनास्थळी पोहोचले. ही कार अहमदाबाद पासिंगची अर्टिगा कार नंबर उ० २७ एण २५७८ आहे. सध्या कारमध्ये प्रवास करणाऱ्या मृतांची ओळख पटलेली नाही. ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.ज्या ट्रेलरला ही कार धडकली तो महाराष्ट्र पासिंगचा होता. पुण्याहून जम्मूला जात होता. वडोदरा एक्सप्रेस-वे आज सकाळी तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ट्रेलर हा हायवेवर डाव्याबाजूला उभा होता. या अपघात एका ५ वर्षाचा मुलाचा मृत्यू झाला आहे. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**काही दिवसांआधीच इथंच झाला होता अपघात**

धक्कादायक म्हणजे, दोन दिवसांपूर्वीच अहमदाबाद-वडोदरा एक्सप्रेस-वे वर नडियाद जवळ एक भीषण अपघात झाला होता. एक खासगी बस उलटली होती. या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला होता. घटनास्थळी वेळीच स्थानिक लोकांनी धाव घेऊन जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

# वकिलांना गुन्हा दाखल होण्यापासून सवलत नाही, उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

**मुंबई :** वकिलांना कायद्यान्वये गुन्हा दाखल होण्यापासून सूट किंवा संरक्षण मिळू शकत नाही, अशी टिप्पणी उच्च न्यायालयाने गुरूवारी केली. कायदा सर्वांसाठी समान असून वकील त्याला अपवाद ठरू शकत नाहीत, असेही न्यायालयाने यावेळी प्रामुख्याने स्पष्ट केले.

भारतीय दंड संहितेचे कलम ३५३ आणि ३३२ वकिलांना लागू केले जाऊ नये आणि त्यांना गुन्हा दाखल होण्यापासून संरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी वकील नितीन सातपुते यांनी अधिवक्ता विनोद रमण यांच्यामार्फत याचिका केली आहे.

# भारतीय मासेमारी बोट अनधिकृत रोख रकमेसह ताब्यात घेतली

**नवी दिल्ली :** भारतीय तटरक्षक दलाने (आयसीजी) मुंबईच्या वायव्येला डिझेलच्या कथित तस्करीत सहभागी असलेली भारतीय मासेमारी बोट अनधिकृत रोख रकमेसह ताब्यात घेतली. सीमाशुल्क विभागाकडून मिळालेल्या माहितीवर आधारित कारवाई करत मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या मासेमारी तसेच व्यापारी रहदारीमध्ये, महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर असलेल्या विकास क्षेत्रासह २०० वर्ग मैलांच्या परिसरात अखंडितपणे शोध मोहीम राबवली.

# पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार, मिरवणुकीत दगडफेक पोलिसांकडून अश्रूधुराच्या नळकांड्यांचा वापर

रामनवमीनिमित्त देशभर जल्लोष साजरा करण्यात आला. परंतु, या जल्लोषाला पश्चिम बंगालमध्ये गालबोट लागले आहे. रामनवमीनिमित्त काढलेल्या मिरवणुकीत दगडफेक करण्यात आला आहे. पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद येथील शक्तीपूर परिसरात हा हिंसाचार घडला. यामुळे या भागात १४४ कलमान्वये संचारबंदी लागू करण्यात आली.

या घटनेचे व्हीडिओ समोर आले आहेत. त्यानुसार, मिरवणुकीत घरांच्या छतावरून दगडफेक केली जात असल्याचं दिसत आहे. परिणामी, जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, पोलिसांनी सांगितलं की, परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली असून अतिरिक्त फौजफाटा या भागात रवाना करण्यात आला आहे. तर, जखमींना बेहरामपूर येथील मुर्शिदाबाद मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

**भाजपाची काँग्रेसवर टीका**

परंतु, भाजपाच्या बंगाल युनिटने याप्रकरणी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावरच आरोप केला आहे. प्रशासनाची सर्व योग्य परवानगी असलेल्या शांततापूर्ण रामनवमी मिरवणुकीवर शक्तीपूर येथील बेलडांगा - खख ब्लॉक, मुर्शिदाबाद येथे हल्लेखोरांनी हल्ला केला. यावेळी पोलिसांनी या भीषण हल्ल्यात हल्लेखोरांना सामील करून अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. मिरवणूक थांबवण्यासाठी आणि रामभक्तांना पांगवण्यासाठी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या, असे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी म्हणाले.

**भाजपाला काँग्रेसचं प्रत्युत्तर**

बेरहामपूरचे खासदार आणि काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी बुधवारी संध्याकाळी येथे भेट दिली. भाजपाच्या आरोपावर काँग्रेसने प्रत्युत्तर दिलं आहे. ही दंगल भाजपाकडून पूर्वनियोजित होती. आणि भाजपाच्या निषेधाने ते सिद्ध होते. मी निवडणूक आयोगाशी यासंदर्भात बोललो आहे. शक्तीपूरला अतिरिक्त फौजफाटा रवाना करण्यात आला आहे आणि पोलीस अधिक्षकही घटनास्थळी आहेत. मी निवडणूक आयोगाच्या सतत संपर्कात, असं रंजन चौधरी म्हणाले.

**ममता बॅनर्जींनी दिला होता इशारा**

रामनवमीनिमित्त दंगल घडू शकते, असा इशारा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आधीच दिला होता. त्यानंतर मुर्शिदाबादमध्ये ही घटना घडली. आजही भाजपाच्या सूचनेनुसार मुर्शिदाबादचे डीआयजी बदलण्यात आले. आता मुर्शिदाबाद आणि मालदा येथे दंगल झाली तर त्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असेल.